
# गांधीबापू

(कुदसिया जैदी यांच्या
'गांधीबाबा' चे भाषांतर)



अनुवादक

**प्रभाकर मंगळवेढेकर**



# गांधीबापू

[ कुदसिया जैदी यांच्या 'गांधीबाबा' चे भाषांतर ]

अनुवादक

**प्रभाकर मंगळवेढेकर**

ISBN 978-81-7229-044-3

मुद्रक व प्रकाशक

विवेक जितेंद्र देसाई

**नवजीवन मुद्रणालय**, अहमदाबाद-३८० ०१४

फोन ; ०७९ - २७५४०६३५, २७०४२६३४

E-mail : sales@navajivantrust.org

Website : www.navajivantrust.org

# गांधीबापू

**हरी** संध्याकाळी घरी आला तेव्हा संध्याकाळचे सहा वाजायला आले होते. त्याने पाहिले की घरात सगळीकडे सामसूम होती, दररोज ओट्यावर बसून गुडगुडी पिणारे आजोबा आज तेथे नव्हते, आणि स्वयंपाकघरात आई पण स्वयंपाक करीत नव्हती. अशी सामसूम पाहून हरी घाबरून गेला. त्याची नजर आईला इकडे तिकडे शोधू लागली. तेव्हा त्याला ती एका कोपऱ्यात रडत बसलेली दिसली.

ह्यापूर्वी हरीने आपली आई रडताना कधी पाहिली नव्हती. तिला रडताना पाहून हरीचे हृदय भरुन आले. तो पण रडायला लागला. थोड्या वेळाने त्याने रडत रडतच आपल्या आईला विचारले, “आई, काय झाले? तू का रडतेस?” आईने अडखळत अडखळत उत्तर दिले, “गांधीजी वारले.” ते ऐकून हरीच्या हृदयाला एकदम धक्का बसला. तो म्हणाला, “आई, ते कशामुळे गेले? कालच तर मी बाबांच्या बरोबर प्रार्थनासभेला गेलो होतो तेव्हा मी त्यांच्या पाया पडलो होतो. त्यांनी खूप प्रेमाने माझ्या गालावर टिचकी मारून म्हटले होते, “आता तरी दंगामस्ती करीत नाहीस ना? आई, कालपर्यंत तर ते अगदी चांगले होते." हरीची ही गोष्ट ऐकून त्याची आई हुंदके देऊन अधिकच रडायला लागली. हरीने रडता रडता पुन्हा विचारले, “आई, ते कसे वारले?”

आई—“हरी ! काय सांगू? ते कसे मरण पावले ते तुला कसे समजावून सांगू? कोणा नीच दुष्टाने त्यांना गोळी घालून ठार केले.”

हरी—“आई, गांधीजींनी त्याचे काय वाईट केले होते? ते तर आपल्या आजोबांपेक्षाही जास्त चांगले होते नाही?"

आई-“होय बाळ ! हे जग असेच आहे. येथे खरे बोलणारे व देवाची भक्ति करणारे लोक वाईट माणसांना आवडत नाहीत. खरी गोष्ट नेहमीच कडू लागते. लोक ती ऐकायला तयार नसतात.”

हरी—"आई, मला बाबांची बंदूक काढून दे. आपल्यापासून गांधीजींना हिरावून घेणाऱ्या दुष्टाला मी आताच्या आता मारून टाकतो." हरी त्वेषाने बोलला.

आई—"बाळा, तुझे म्हणणे बरोबर नाही. गांधीजींनी तर आपल्याला शिकवले आहे की एकाद्याला मारणे हे पाप आहे. तू गांधीजींना पाहिले आहेस, पण ओळखले नाहीस. चल, मी तुला ते कोण होते, कसे होते, त्याची गोष्ट सांगते.

"हरी, लहानपणी गांधीजी तुझ्यासारखेच. एक सामान्य मूल होते हे ऐकून तुला आश्चर्य वाटेल. पण सतत प्रयत्न करून ते कुठल्या कुठे पोहोचले. प्रेम आणि सेवेच्या बळावर ते गोतम बुद्धासारखे महात्मा झाले. ते ह्या देशाचे सर्वात मोठे सेवक होते. त्यांच्या डोक्यावर मुकुट नव्हता पण येथील चाळीस कोटी लोकांच्या हृदयावर त्यांची सत्ता होती. देशातल्या लहानांत लहान माणसापासून ते मोठ्यात मोठ्या माणसापर्यंत सर्वजण त्यांना पितृतुल्य मानीत. सगळे त्यांना गांधीबापू ह्या नावाने हाक मारीत. कारण ते दुसऱ्याचे दुःख पाहून दुःखी होत व दुसऱ्याचे सुख पाहून आनंदित होत. गरिबांच्या बद्दल त्यांना फार जिव्हाळा होता. ते गरिबांच्या सारखे साधे राहत होते. ते फक्त खादीचा एक पंचा नेसत. पांघरायलासुध्दा त्यांच्याजवळ एकच खादीची चादर होती. त्यांचे जेवण म्हणजे बकरीचे दूध व उकडलेल्या भाज्या. बाळ, ते खरोखरच महात्मा होते."

हरी—"आई. मुलांच्यावर त्यांची फार माया होती. ते केव्हा केव्हा त्यांना हसवीत मजेच्या गोष्टी सांगीत आणि कधी कधी त्यांना फिरायला घेऊन जात. ते मुलांच्या बरोबर जात तेव्हा ते पण एक लहान मूलच आहे असे वाटे. आई, तू मला पहिल्यापासून गांधीजींची गोष्ट सांग."

आई—"बरे ऐक. जशी जशी मला आठवेल तशी तशी मी तुला गोष्ट सांगत जाईन आज स्वैपाक तर करायचा नाही. आज कोण जेवणार? तुझे आजोबा अधिक माहितीसाठी शेजारी रेडिओ ऐकायला गेले आहेत. ते येतील तोपर्यंत मी तुला गांधीबापूची गोष्ट सांगते. त्यामुळे माझे मनही थोडेसे हलके होईल."

अशा तऱ्हेने हरीच्या आईने बापूजींची अमर कहाणी सांगायला सुरुवात केली.

# १

**"मुंबईच्या** उत्तरेस असलेल्या काठेवाडमधील एका संस्थानचे नाव आहे पोरबंदर. तेथे त्याच नावाचे एक बंदरही आहे. ते त्या संस्थानची राजधानी आहे. अनेक वर्षापूर्वी, जेव्हा तुझे आजोबा आता तू आहेस त्यापेक्षा लहान होते तेव्हा पोरबंदरला करमचंद गांधी नावाचे एक गृहस्थ राहत होते. ते जातीनं वाणी होते, पण त्यांच्या कुटुंबातील लोक चांगले शिकले सवरलेले होते. त्या घराण्यात तीन पिढ्यांपासून वडिलांच्या मागून मूलगा काठेवाड संस्थानचा दिवाण होत आला होता.


"करमचंद खूप सत्यवचनी, बहादूर व दानशूर होते. लोकांत त्यांचा खूप मान होता. त्यांच्या शब्दाला लोक दगडावरची रेघ मानीत. त्यांचा स्वभाव थोडा कडक होता म्हणून लोकांच्यावर त्यांचा वचक असे. ते काठेवाडच्या राजामहाराजांची भांडणे सोडवायची कामे करीत. ते नेहमी खरे बोलत, खरा सल्ला देत, त्यामुळे लोक त्यांच्याकडे नेहमी आदराने पाहत.

"खूप वर्षांपर्यंत करमचंद पोरबंदरला राहिले. नंतर त्यांना तेथे न जमल्यामुळे ते राजकोटला गेले. राजकोट पण काठेवाडमधील एक संस्थान आहे. बैलगाडीतून पोरबंदरहून राजकोटला जायला पाच दिवस लागत. राजकोटच्या महाराजांना ठाकूर साहेब म्हणत असत. ते करमचंदना खूप मान देत. थोड्याच वर्षात त्यांनी करमचंदांना राजकोटचे दिवाण केले.

"एका बाबतीत करमचंदांचे नशीब वाईट होतं. त्यांनी तीन लग्ने केली पण परमेश्वराने त्यांच्या तिन्ही बायकांना एका मागून एक बोलावून घेतले. चाळिसाव्या वर्षी त्यांनी पुतळीबाई बरोबर चौथे लग्न केले. तिच्यापासून त्यांना एक मुलगी व तीन मुलगे झाले.

"करमचंद आणि पुतळीबाई हे दोघेही सज्जन होते व आपला धर्म पाळण्यात कट्टर होते. दोघेही दररोज देवळात जाऊन देवाला फुले वाहत असत. करमचंदापेक्षा पुतळीबाई धर्म पाळण्यात नियमित होत्या. त्या देवळात गेल्या नाहीत असा एकही दिवस गेला नाही. सणावारी त्या व्रत करीत आणि आजारी पडल्या तरी त्या ते व्रत पुरे करीत. वेगवेगळी व्रते त्या करीत असत.

एकदा त्यांनी पावसाळ्यात सूर्यनारायणाचे दर्शन घेतल्याशिवाय जेवायचे नाही असे व्रत घेतले होते. हरी, तुला माहीत आहे ना की पावसाळ्यात सूर्य कित्येक दिवस ढगाआड लपून राहतो. अशा दिवसात, त्या कामात असत त्यावेळी मुले अंगणात येऊन आकाशाकडे नजर लावून उभी राहत, आणि सूर्य दिसला की आईला बोलावून तो दाखविण्याची वाट पाहत. सूर्य दृष्टीस पडताच पळत जाऊन मुले आईला सांगत पण आई येई तेवढ्यात लपंडाव खेळणारा सूर्य फिरून ढगाआड लपून जाई. त्या दारात येत पण सूर्याचे दर्शन न झाल्यामुळे 'काही हरकत नाही, आज नशिबात जेवायचे नसेल' असे म्हणून त्या पुन्हा घरात जाऊन कामाला लागत. पुतळीबाई धर्माच्या बाबतीत कट्टर होत्या. पण त्याच बरोबर तितक्याच व्यवहारीही होत्या राजकोटच्या राजमहालातील सगळया राण्या त्यांच्याकडे आदराने पाहत, आणि राजमाता तर त्यांना विचारल्याशिवाय कोणतेही काम करीत नसत.



गांधीजींचे जन्मस्थान – पोरबंदर

"पुतळीबाईंच्या चार मुलांमध्ये सगळ्यात मोठ्या आणि सगळ्यात लहान मुलांमध्ये सहा वर्षाचे अंतर होते. सगळयात लहान मुलाचा जन्म १८६९ साली झाला होता. हे मूल दिसायला फारसे सुंदर नव्हते पण कोण जाणे कां करमचंद, पुतळीबाई व इतर भाऊबहिणी त्याला पाहून खूप आनंदित होत. सर्व भाऊबहिणी वारंवार त्याला पाहावयाला येत आणि तो लहान भाऊ डोळे उघडून, तोंडात पायाचा अंगठा घालून सगळ्यांकडे टकमक बघत असे.

"एक चांगला दिवस पाहून वडिलांनी त्याचे नाव 'मोहनदास' ठेवले आणि काठेवाडच्या रिवाजाप्रमाणे वडिलांचे करमचंद नाव आणि कुटुंबाचे गांधी आडनाव बरोबर जोडता त्यांचे संपूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे झाले.

"मोहनदास पाच वर्षाचा झाला तेव्हा शाळेत घालण्यात आले. शाळेतील धडे तो कसे तरी लक्षात ठेवी पण पाढे मात्र त्याला काही केल्या लक्षात राहत नसत. एकीकडे तो घोकायचा तर दुसरीकडे तो विसरून जायचा.

"मोहनदास जवळ जवळ सात वर्षांचा झाला असेल त्यावेळी त्याच्या वडिलांना—करमचंद यांना-नोकरीसाठी पोरबंदर सोडून राजकोटला जावे लागले. मुलांना जुने घर सोडताना फार दुःख झाले. पण राजकोटला पोहोचल्यानंतर दोनचार दिवसांतच सगळे जुने घर विसरून गेले आणि नव्या घरात आनंदाने राहायला लागले.



गांधीजी – वय ७ वर्ष

"मोहनदासाची आई जुन्या विचारांची होती त्यामुळे ती अस्पृश्यता मानीत होती. ती मोहनदासला नेहमी सांगे की एकाद्या महाराचांभाराला स्पर्श झाला तर ताबडतोब आंघोळकरुन कपडे बदलावेत. मोहनदासच्या घरी त्यांच्या भंग्याचा उका नावाचा मुलगा दररोज झाडलोट करण्यास यायचा. चुकूनदेखील मोहनदास त्याला शिवला तर आई त्याला ताबडतोब आंघोळ घाली. मोहनदास आंघोळ करायचा खरा पण उका हा खालच्या जातीचा आणि

अस्पृश्य का, त्याला समजत नव्हते. हळूहळू तो असा विचार करायला लागला की आपणदेखील कोणत्या प्रकारे अस्पृश्य होऊन जावे आणि मग त्यांना ब्राह्मणा इतकेच वर आणून दाखवावे.

"मोहनदास सगळ्याच दृष्टीने सर्वसामान्य मुलांच्या सारखा होता. पण त्याच्यामध्ये एक विशेष गुण असा होता की कितीही सहन करावे लागले तरी तो नेहमी खरे बोलत असे. एकदा एक इंग्रज साहेब मोहनदासची शाळा तपासण्यास आले हाते. त्यांनी शुद्धलेखनाची परीक्षा घेण्यासाठी पाच शब्द लिहिले. मोहनदासने एक शब्द चुकिचा लिहिला. मास्तरांनी खूण करून मोहनदासला सांगितले की शेजारच्या मुलाची वही पाहून शुद्धलेखन सुधारून घे. मास्तर खूण करून करून दमले पण मोहनदासला कळले नाही. शेवटी त्यांनी स्वत:च्या बुटाचे टोक मोहनदासचा पायावर दाबले. त्यामुळे ते मूल बिचारे कळवळले. पण भोळ्या आणि प्रामाणिक मोहनदासला मास्तर आपल्याला दुसऱ्याचे बघून लिहायला सांगत आहेत हे लक्षात आले नाही."

हरी—"आई, विद्यार्थ्याला खोटे करायला शिकणारे ते मास्तरदेखील अजबच दिसतात. आमच्या शिक्षकानी जर आम्हाला असे दुसऱ्याचे बघून लिहिताना पाहिले तर ते आमचा कान पकडून बाहेर काढल्याशिवाय राहणार नाहीत."

आई—"बाळ, हे खरे. पण मोहनदासनी किती प्रामाणिकपणे काम केले ते पाहा."

हरी—"बरे, आई, पुढे काय झाले?"

# २

**आई—"मोहनदासवर** दोन गोष्टींचा खूप खोल प्रभाव पडला होता. त्यांतील एक गोष्ट होती राजा हरिश्चंद्राची. ह्या गोष्टीवरील नाटक तर तो वरचेवर पाहावयास जात होता. दुसरी गोष्ट होती श्रावणाची.

"पहिली गोष्ट अशी आहे—हजारा वर्षांपूर्वी आपल्या देशात हरिश्चंद्र नावाचा एक खूप सत्यवादी व दानशूर राजा होऊन गेला. एकदा त्याच्या नगरात मोठा दुष्काळ पडला. राजाने स्वत:जवळ होते ते सगळे विकून टाकून आपल्या प्रजेला मदत केली. ह्यामुळे त्याच्यापाशी फुटकी कवडीसुद्धा राहिली नाही. तो अगदी दरिद्री झाला. ईश्वराची करणी अशी की देवाला देखील ह्याचवेळी राजाची सत्त्वपरीक्षा आणि सत्यपरीक्षा करायचे सूचले. एक देव वेष बदलून साधू होऊन राजाकडे भीक मागण्यास आला. घरात जे काही होते ते सर्व राजाने भिकाऱ्याला आणून दिले. भिकाऱ्याने आणखी मागितले. तेव्हा राजाने स्वत:च्या दासदासी विकल्या आणि जे काही मिळाले ते सर्व भिकाऱ्याच्या हाती ठेवले.

"भिकारी पुन्हा म्हणाला, 'महाराज, एवढ्याने माझे काम होणार नाही. म्हणत असाल तर जवळ जो डोम राहत आहे त्याच्याकडे जाऊन मी भीक मागतो. परंतु राजाकडे आलेल्या भिकाऱ्याला डोमापुढे हात पसरायला लागावा ह्याची मला लाज वाटते.' हे ऐकताच हरिश्चंद्र स्वत: साधूच्या बरोबर त्या डोमाकडे गेला आणि त्याने स्वतःला त्याच्याकडे गहाण ठेवले व त्या साधूची मागणी पूर्ण केली. साधू आपल्या घरी निघून गेला. डोमाने राजाला स्मशानात काम करण्यास पाठवून दिले. डोम स्मशानात चिता पेटवण्यासाठी विस्तव देण्याचे आणि प्रेते जाळण्यासाठी येणाऱ्यापासून कर वसूल करण्याचे काम करीत होता.

"थोड्या दिवसानी हरिशचन्द्राचा एकुलता एक मुलगा रोहिताश्व वारला. राणी त्याचे प्रेत जाळण्यासाठी स्मशानात चिता रचीत होती. राजाने तिच्यापाशी येऊन कर मागितला. पाणवलेल्या डोळयांनी राणी म्हणाली, 'नाथ, अंगावर नेसलेल्या ह्या एका वस्त्राशिवाय

माझ्याजवळ दुसरे काहीच नाही.' राजाचे मन द्रवले, पण तो डगमगला नाही. मोठ्या धैर्याने तो म्हणाला, राणी, मी लाचार आहे. चिता पेटवण्यासाठी विस्तव देण्यापूर्वी कर वसूल करणे हा माझ्या मालकाचा हुकम आहे. या हुकमाचा अंमल करणे हे माझे कर्तव्य आहे. राणीने लुगड्याचे टोक हातात धरले तेवढ्यात राजा आणि राणी यांची सत्यप्रियता, त्याचे दृढ व्रत आणि त्यांचे धैर्य पाहून देव थरथर कापायला लागले. विमानात बसून सगळेच स्मशानात येऊन पोहोचले. राजपुत्राला त्यांनी जिवंत केले आणि राजा, राणी व राजपुत्राबरोबर त्या डोमाला पण ते वैकुंठात घेऊन गेले.

"बाळ हरी ! ही गोष्ट मोहनदासाच्या मनात बिंबली तो देवाजवळ नेहमी हेच मागायचा की देवा जर सत्यपरीक्षेची वेळ आली तर हरिशचंद्राप्रमाणे मी त्यातून पार व्हावे अशी शक्ती मला दे. मोठा झाल्यावर मोहनदासाने खरोखरीच सत्यासाठी स्वत:चे जीवन पणाला लावले व त्या कसोटीमधून तो असा काही उतरला की सगळे जग आश्चर्यचकित झाले."

एवढी गोष्ट सांगता सांगता हरीच्या आईचा गळा दाटून आला. तेव्हा थोडा वेळ थांबून तिने पुन्हा सांगण्यास सुरूवात केली.

"दुसरी गोष्ट श्रावणाची होती. ती वाचून मोहनदास लोकांची सेवा करणे शिकला. श्रावणाचे आईवडील दोघेही म्हातारे आणि आंधळे होते. तो जेथे जेथे जायचा तेथे तेथे स्वत:च्या आईवडिलांना कावडीत बसवून बरोबर घेऊन जायचा. तो काबाडकष्ट करून त्यांचे पालन-पोषण करायचा आणि सर्व प्रकारे त्यांची सेवा करायचा. नशिबात लिहिले असेल म्हणूनच एकदा दशरथ राजा जंगलात शिकार करण्यास निघाला. श्रावण नदीच्या काठी आपल्या आईवडिलांसाठी पाण्याची घागर भरत होता. एकादे हरीण पाणी पीत आहे असे समजून दशरथ राजाने दुरून त्याच्यावर बाण सोडला. बिचारा श्रावण जखमी झाला व तडफडायला लागला. वेदनांमुळे तो कण्हू लागला. अशा वेळीदेखील त्याला आपल्या म्हाताऱ्या आई—वडिलांचे विचार येते होते. मरण्यापूर्वी त्याने दशरथ राजाबरोबर त्यांच्यासाठी पाणी पाठवले आणि सांगितले की पाणी पाजल्यानंतरच त्यांना माझ्याबद्दलची बातमी सांग. दशरथाने त्याप्रमाणे केले. श्रावणाच्या

आईवडिलानी पाणी प्याल्यानंतर दशरथाने त्यांना श्रावण्याच्या मृत्युची बातमी सांगितली. बिचारे वृद्ध व अशक्त तर होतेच त्यात ही बातमी ऐकून दु:खाने व्याकुळ होऊन इतके रडले की ते जागच्या जागी थिजून गेले. दशरथ राजाने श्रावणाच्या चितेबरोबर त्याच्या आईवडिलांची चिता पण रचली आणि तिघांना बरोबरच अग्नि दिला."

हरी—"आई, मग राजा दशरथाचे काय झाले?"

आई—"बाळ, तो पण आपल्या मुलांच्या विरहाने झुरून झुरून मरण पावला."

हरी—"आई, ही गोष्ट वाचून गांधीजींनी काय केले?"

आई—"ह्या गोष्टी वाचून मोहनदासने हरिश्चंद्राप्रमाणे सत्य बोलण्याचा त्याच प्रमाणे श्रावणासारखे दु:खी लोकांची सेवा करण्याचा मनात निश्चय केला. आता हरिश्चंद्र व श्रावण हे नेहमीच त्याच्या दृष्टीसमोर राहू लागले. श्रावणाने फक्त स्वत:च्या आईवडिलांची सेवा केली, पण मोहनदासने त्याचे उदाहरण घेऊन मोठेपणी कोट्यावधी लोकांच्या सेवेत तन, मन, धन सर्वच समर्पित केले. स्त्री-पुरुष लहान-मोठे, हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-हरिजन, राजा-रंक हे सर्व त्यांच्या मनी सारखेच होते. त्या सर्वांबद्दल त्यांना सारखेच प्रेम वाटायचे."

हरी पुतळ्यासारखा बसून एकाग्रतेने गोष्ट ऐकत होता. ते पाहून हरीच्या आईला खूपच आनंद झाला. तिला कळले की प्रत्येक गोष्ट हरीच्या हृदयात बिंबली जात आहे. खिडकीतून गार वारा येत होता म्हणून हरीच्या आईने उठून ती बंद केली व नंतर गोष्ट पुढे चालू केली.

## ३

**“मोहनदासच्या** आईवडिलांनी लहानपणीच त्याचे लग्न पोरबंदरच्या कस्तुरबाई नावाच्या एका मुलीबरोबर केले होते. त्यावेळी मोहनदास मनातल्या मनात खूष झाला होता. त्याला वाटले चला लग्नानंतर चांगले चांगले कपडे घालायला मिळतील व एका नवीन मुलीबरोबर खेळायला मिळेल. पण मोठेपणी मोहनदास नेहमी म्हणायचा की मुलांचे लहानपणी लग्न करणे ही चांगली गोष्ट नाही. ते नेहमी अशा लग्नांच्या विरुद्ध होते.

“लग्न होताच भोळ्या-भाबड्या कस्तुरबाईला 'इकडे जाऊ नकोस, तिकडे जाऊ नकोस, अमुक मैत्रिणीला भेटू नकोस, तमुक माणसाला भेटू नकोस' अशी मोहनदास तिला मनाई करू लागला. मोहनदासच्या अशा विचित्र बोलण्याने कस्तुरबाई चिडली. जितके मोहनदास तिला उगीचच दटवावयाचा तितके ती त्याचा खंबीरपणे विरोध करी. कितीतरी वेळा अशा गोष्टीतून एवढे मोठे भांडण व्हावयाचे की दोघांचे एकमेकांशी बोलणे-चालणे बंद होई.”

हरी—“आई, मोहनदास असे का करायचा?”

आई—“बाळ, त्याचे असे होते की अशा भांडणाला मोहनदास प्रेमाचे प्रतीक मानायचा. लग्नाच्या जंजाळात फसल्यानंतरसुद्धा मोहनदासचे शिक्षण चालू राहिले. वरच्या वर्गांत गेल्यावर त्याची गणना वर्गातल्या हुशार विद्यार्थ्यांमध्ये होऊ लागली. शाळेत तो नेहमी अशा प्रकारे वागायचा प्रयत्न करी की लोकांनी त्याला फक्त सत्यवचनी व एकवचनी विद्यार्थी म्हणून ओळखावे. कोणी गमतीने देखील त्याला खोटारडा म्हणाल्यास त्याला खूप वाईट वाटायचे आणि तो तासन् तास रडत बसायचा.

“मोहनदासचा एक असा नाद होता की तो आपल्या आडमार्गी गेलेल्या मित्रांना खऱ्या व योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करी. त्यात त्याला केव्हा केव्हा यश पण मिळे. अशा रीतीने मित्रांना योग्य मार्गावर आणण्याच्या नादात त्याने एका अत्यंत वाईट व उडाणटप्पू मुलाची संगत धरली. कस्तुरबाईने, इतकेच नव्हे तर मोहनदासच्या आईवडिलांनी पण त्याला अनेक वेळा त्या

मित्राची संगत सोडण्यास सांगितले. पण मोहनदासने त्यांची गोष्ट एका कानाने ऐकली व दुसऱ्या कानाने सोडून दिली.

“मोहनदास खूपच नरम स्वभावाचा आणि भित्रा आहे, अंधाऱ्या खोलीत तो कधी जात नाही, पण कसेही करून तो खूप शूर व पहिलवान बनू इच्छितो ही गोष्ट त्याचा हा मित्र चांगल्या प्रकारे जाणीत होता. त्याने मोहनदासला म्हटले, मोहन, शूर बनण्याचा एकच उपाय आहे आणि तो हा की तू मांस खाण्याचे सुरू कर. इंग्रज हिंदुस्थानातील लोकांपेक्षा किती धृष्टपुष्ट आणि शक्तिवान आहेत ते पाहा. मांस खात असल्यामुळेच ते दुबळ्या भारतीयांच्यावर राज्य करीत आहेत. 'शूरववीर बनायच्या नादात वेडा झालेल्या भोळ्या मोहनदासने ही गोष्ट खरी मानली आणि तो मांस खायला तयार झाला.

“हरी. वैष्णव धर्मात मांस खाण्याची मनाई आहे हे तुला माहीत आहे. मोहनदासला मांस तर खायचे होते पण खायचे कसे? त्याच्या घरी मांस आणीत नसत म्हणून त्याच्या मित्राने नक्की केले की मोहनदासला आपल्या घरी जेवायला बोलवायचे आणि कुणालाही कळणार नाही अशा रीतीने मोहनदासला मांस खाऊ घालायचे आमंत्रण मिळाल्याप्रमाणे मोहनदास आपल्या मित्राच्या घरी जेवायला गेला. सर्व जेवायला बसले. मोहनदासने मांसाचा तुकडा गिळण्याचा खूप प्रयत्न केला पण काही केल्या तो गळ्याखाली उतरेच ना. शेवटी त्याला उलटी झाली आणि नाईलाजाने जेवता जेवता त्याला उठावे लागले. घरी पोहोचल्यावर त्याची स्थिती फारच वाईट झाली. झोपेत आणि जागेपणी त्याला असे वाटे की आपल्या पोटात शेळी बें बें करीत आहे. ह्या घटनेनंतरही मोहनदासने मांस खाण्याचे प्रयत्न केले. पण त्याला मांस कधीच आवडले नाही.

“ज्या दिवशी मांस खाण्याचा कार्यक्रम असायचा त्या दिवशी मोहनदासला घरी पोहोचण्यास नेहमी उशीर व्हायचा आणि घरच्या माणसांपुढे खोटे बोलावे लागायचे. घरी उशीरा येण्याबद्दल दोन-चार वेळा त्याने खोटी कारणे सांगितली. पण नंतर त्याला वाटले की आईवडिलांच्या पुढे खोटे बोलून व त्यांना फसवून मी शूरवीर व बलवान झालो तरी त्याचा काय उपयोग? ही गोष्ट समजल्यावर त्याने प्रतिज्ञा केली की मी वाटेल तितका अशक्त आणि भित्रा

राहिलो तरी चालेल पण मी मांसाहार कधीही करणार नाहीं आणि खोटे तर कधीच बोलणार नाही. आईवडिलांना फसवून व त्यांच्यापुढे खोटे बोलून बेडर आणि बलवान बनणे अगदी व्यर्थ आहे.”

हरीने न भिता विचारले—“आई, तर मग ते इतके बेडर आणि शूरवीर कसे झाले?"

आई—“खोटे बोलणे तर मोहनदासने सोडले पण बेडर आणि शूरवीर व्हायचे त्याचे वेड सुटले नाही. मोहनदासच्या घरी रंभा नावाची एक म्हातारी मोलकरीण होती. मोहनदास अंधाराला किती भितो ते तिला माहीत होते. एक दिवस बोलता बोलता रंभाने मोहनदासला सांगितले, 'हे पाहा, तुला अंधारात जायला भीती वाटली अथवा काही अडचण आली तर ताबडतोब रामाचे नाव घ्यायला सुरू कर. तसे केल्याने तुझी भीती नाहिशी होईल'."

हरी—“आई, मग काय खरोखरीच रामनामाचा जप केल्याने त्याच्या मनातून भीती नाहिशी झाली?”

आई—“बाळ, ह्या नावात मोठा गुण आहे. कोणी शुद्ध मनाने देवाची मदत मागितली तर तो त्याला मदत केल्याशिवाय कधीही राहत नाही.”

हरी—“मला पण अंधाऱ्या खोलीत जायची भीती वाटते. ह्यापुढे मी देखील अंधारात जाताना जेव्हा भीती वाटेल, तेव्हा रामनामाचा जप करीन."

## ४

**"मांस** खाण्याचा नाद मोहनदासने मोठ्या माणसांच्यासाठी सोडला खरा पण आता त्याला झटपट मोठा होण्याचे वेड लागले. मुलांना जेव्हा झटपट मोठे होण्याचा ध्यास लागतो, तेव्हा त्यांना तऱ्हेतऱ्हेच्या युक्त्या सुचतात. मोठ्यांची नक्कल करून ते मोठे होण्याची हौस भागवतात. मोहनदास त्याच्या काकाना तोंडातून धूर काढताना पाही तेव्हा त्याला पण त्याच्यासारखे बिडी पिऊन नाका-तोंडातून धूर काढण्याची इच्छा होत असे. मोहनदासने त्याच्या एका मित्राबरोबर बिडी पिण्याचे ठरवले, पण बिडी आणायची कोठून? खिशात तर फुटकी कवडी पण नव्हती, म्हणून त्याने बिडीची थोटके न्यायला सुरुवात केली. त्याचे काका उठून निघून जात तेव्हा मोहनदास व त्याचा मित्र दोघेही गुपचुप बिडीची थोटके गोळा करीत. लपूनछपून असली थोटके ओढण्यात त्यांना खूप मजा वाटे. पण थोडया दिवसानंतर एवढ्याने त्यांचे समाधान होईना, तेव्हा त्याने नोकरांच्या खिशातून पैसे काढून घेऊन बिडया विकत आणण्याचे सुरू केले. पण असे लपून बिडी पिण्यात दोघांच्या मनाला बरे वाटत नसे. एक दिवस दोघोही मित्र पुष्कळ वेळपर्यंत खूप उदास होऊन बसून राहिले. त्यांना वाटले हे तर काय जीवन म्हणायचे? आपण उघडपणे हौसेने विडी पिऊ शकत नाही. असा विचार करता करता त्यांचे मन अधिकाधिक गुदमरायला लागले दोघांनाही वाटले की ह्याच्यापेक्षा आत्महत्या करून मरून जावे. म्हणून त्या दोघानीही धोतऱ्याच्या बिया गोळा केल्या. त्या खाऊन आत्महत्या करण्याच्या शुभकार्यासाठी संध्याकाळचा मुहूर्त ठरविला. बिया खाणारच होते पण तेवढ्यात त्यांना विचार आला की बी खाऊनदेखील मेलो नाही तर काय करायचे? हा विचार येताच त्यांनी आत्महत्या करण्याचा विचार सोडून दिला आणि त्याचबरोबर बिडी न पिण्याची प्रतिज्ञा केली."

हरी—"आई, मोठे झाल्यावर मोहनदासने बिडी ओढली असेल नाही?"


आई—"नाही बाळ, त्या दिवसापासून ते आजपर्यंत त्यांनी बिडी तोंडाला देखील लावली नाही."

“आत्महत्येचा विचार काढून टाकताच त्यांच्या मनावरील एक मोठे ओझे उतरले आणि जीवन पहिल्यासारखे सुंदर वाटायला लागले.

“एक दिवस मोहनदास घरात बसल्या बसल्या काहीतरी वाचत होता तेवढ्यात त्याचा भाऊ त्याचे जवळ आला. त्याच्या तोंडावरून तो घाबरल्याचे दिसत होते. त्याने मोहनदासजवळ बसून त्याच्या कानाजवळ काहीतरी कुजबूज केली. त्याचे असे झाले होते की मोहनदासच्या भावाला वीस-पंचवीस रुपयाचे देणे झाले होते आणि ते चुकविण्यासाठी त्याला भावाची मदत हवी होती. मोहनदासने खूप विचार करून शेवटी एक उपाय शोधून काढला. संधी मिळताच एक रात्री त्याने दुसऱ्या भावाच्या कड्यातून सोन्याचा एक लहान लगडी कापून घेतला व तो विकून देणे चुकते केले.”

हरी—“आई, तू तर म्हणतेस की चोरी करणे पाप आहे. तर मग मोहनदासने चोरी का केली असावी?"

आई—“बाळ हरी, अशी चूक तर सर्व मुले करीत असतात, पण चूक केली हे समजताच जी मुले पश्चात्ताप करतात व पुन्हा अशी चूक करीत नाही ती मुले प्रामाणिक म्हणून ओळखली जातात, समजले?



“एका भावाला कर्जातून सोडविण्यासाठी दुसऱ्या भावाच्या कड्यातून सोन्याच्या तुकड्याची चोरी मोहनदासने केली अवश्य, पण नंतर त्याला आपली चूक समजली. त्याला चैन पडेना. काय करावे ते त्याला सुचत नव्हते. खूप विचार केल्यानंतर त्याने गुपचुप आपल्या वडिलांना एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी चोरी केल्याचे कबूल केले आणि या नंतर चोरी करणार नाही असे वचन

दिले. त्याचबरोबर असेदेखील लिहिले की वडिलांनी कितीही कडक शिक्षा केली तरीदेखील तो वाईट वाटून घेणार नाही व ती शिक्षा आनंदाने सहन करेल.

“मोहनदासचे वडील त्यावेळी आजारी असल्याने अंथरुणात झोपून असत. मोहनदास पत्र घेऊन त्यांच्याकडे गेला. त्याने त्यांच्या हातात पत्र ठेवले. त्यांच्या जवळच पलंगावर तो युपचुप बसला. मोहनदासचे वडील उठून बसले आणि त्यांनी ते पत्र वाचले. पत्र वाचताच त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. जणू काही त्यांची आसवे गळत होती आणि त्या पाण्याने मोहनदासची पापे धुवून निघत होती. मोहनदासवर या अश्रुबिंदूंचा असा पांरणाम झाला की त्यांचे जीवन फार बदलले. तो आता पूर्वीपेक्षा कितीतरी चांगला मुलगा झाला.”

हरी—“आई, मोहनदासचे वडील कशासाठी रडले? त्यांनी मोहनदासला मारले का नाही?”

आई—“बाळ, मोहनदासचे धैर्य आणि खरेपणा पाहून त्याच्या वडिलांचे हृदय भरून आले. मोहनदासला न मारताच त्यांनी स्वत: दु:खी होऊन मोहनदासवर जो परिणाम घडवनू आणला तो मोहनदासला मारून घडला नसता. मारापेक्षा अशा प्रेमाचा त्याच्यावर खोल परिणाम झाला.

“मोहनदासच्या जीवनात अहिंसेचा हा पहिला धडा होता. मोठा झाल्यावर ह्याच अहिंसेच्या जोरावर त्याने इंग्रजांशी न लढताच त्यांना या देशामधून आपल्या देशी जायला भाग पाडले आणि आपला देश स्वतंत्र केला. थोड्याच दिवसात चोरीच्या घटनेचा विसर पडला. पण एवढे मात्र खरे की त्याचे वडील त्याच्यावर पूर्वीपेक्षा जास्त प्रेम करू लागले. का नाही करणार? कारण मोहनदास एक सत्यवादी व प्रामाणिक मुलगा होता.”

हरी—“आई, मी देखील जर यापुढे नेहमी खरे बोलेन तर माझे वडील पण माझ्यावर पूर्वीपेक्षा जास्त प्रेम करतील ना?”

आई—“होय बाळ, केवळ तुझे वडीलच नव्हे तर सर्वजण तुझ्याशी प्रेमाने वागतील.”

हरी—“आई, ठीक मग काय झाले?"

आई—“ईश्वराची इच्छा असेल म्हणूनच त्या दिवसात मोहनदासचे वडील खूप आजारी पडले. घरातील सर्वजण त्यांची सेवा-शुश्रूषा करायचे, पण मोहनदास त्यांची सेवा सर्वांत जास्त करायचा. शाळा सुटल्यावर तो झटपट घरी येई आणि वडिलांच्या शुश्रूषेंत मग्न होई. तो त्यांना औषध देई, त्यांचे कपडे बदली आणि तासनतास बसून त्यांचे पाय दाबी. एका रात्री पाय चेपण्याचे काम संपवून काही कामासाठी तो आपल्या खोलीत गेला. तेवढ्यात नोकराने दार ठोठावले आणि त्याला वडील वारल्याची बातमी दिली. वडिलांच्या मृत्यूसमयी त्यांच्याजवळ न राहू शकल्याचे दुःख मोहनदासला शेवटपर्यंत टोचत होते.”

हरी—“अरेरे बिचारा किती रडला असेल नाही?”

आई—“होय बाळ, आणि आज त्याच मोहनदाससाठी फक्त हिंदुस्थानच नाही तर सारे जग रडत आहे.”

## ५

**"अठरा** वर्षांचा असताना मोहनदास मॅट्रिक झाला. त्याच्या वडिलांच्या एका जुन्या मित्राच्या सल्ल्यावरून मोहनदासच्या मोठ्या भावाने त्याला बॅरिस्टर होण्यासाठी विलायतेस पाठविले. विलायतेत धर्म पाळणे कठीण असते असे त्याकाळी लोक मानीत असत. म्हणून मोहनदासला विलायतेस पाठविण्याबाबत त्याच्या घरातील मंडळी कशीबशी कबूल झाली.

"विलायतेस पाठवण्यापूर्वी त्याच्या आईने त्याला तीन प्रतिज्ञा घ्यायला लावल्या. एक मांस न खाण्याची, दुसरी दारू न पिण्याची व तिसरी सर्व मुलींना स्वतःच्या बहिणी मानण्याची मोहनदासाने मनापासून ह्या प्रतिज्ञा घेतल्या आणि आई, भाऊ व मोठ्यांचे आशीर्वाद घेऊन तो विलायतेस जायला निघाला.

"जाण्याआधी त्याने इंग्रजी पद्धतीचे खूप कपडे शिवून घेतले, चकचकीत बूट घेतले व रंगबेरंगी टाय पण घेतले. सुरुवातीला मोहनदासला टाय बांधता पण येत नव्हता. जेव्हा तो टाय नीट बांधायला शिकला तेव्हा इंग्रजी पद्धतीच्या कपड्यांमध्ये टाय त्याला सर्वात अधिक आवडू लागला होता.

"आगबोट जेव्हा विलायतेच्या बंदरावर पोहोचली त्या दिवशी मोहनदास अगदी पहिल्यांदाच परदेशच्या भूमीवर पाय ठेवीत होता. त्या दिवशी जास्तीत जास्त चांगले कपडे घातले पाहिजेत असे त्याला वाटले. त्याने पेटी उघडली व पांढऱ्या फ्लॅनेलचा कोट व पेंट काढली आणि ते कपडे घालून खूप ऐटीत तो बंदरावर उतरला. उतरल्याबरोबर नजर वर करताच त्याने पाहिले की बाकी सगळ्या लोकांना गडद रंगाचा कोट व पेंट घातली होती व त्याने एकट्यानेच पांढऱ्या रंगाचे कपडे घातले होते. त्यामुळे सर्वजण त्याच्याकडे आश्चर्याने बघतच राहिले. लाजेने त्याला घाम फुटला. कसाबसा तो हॉटेलात पोहोचला. दुर्दैवाने दुसऱ्या दिवशी रविवार असल्यामुळे कचेऱ्या बंद होत्या. त्यामुळे बंदरावर सामान येणे पण शक्य नव्हते. बिचाऱ्या मोहनदासाला तीन

दिवस तोच पांढरा कोट व तीच पेंट घालणे भाग पडले. त्यामुळे त्याने शक्य तितके हॉटेलच्या बाहेर जाणे टाळले व हॉटेलमध्येच स्वत:ला कोंडून घेतले.

"विलायतेत मोहनदासने पाहिले की सगळे फेशनेबल लोक उंच हॅट घालतात. त्यांना पण हौस वाटली की चला, आपणदेखील उंच हॅट घेऊ या. मुळात तो लाजरा होता. पण सर्व धैर्य एकवटून तो हॅटवाल्याच्या दुकानात गेला आणि जी हॅट सर्वात आधी दृष्टीस पडली ती खरेदी करून तो घरी आला. घरी आल्यावर हॅट घालून पाहिली तेव्हा त्याच्या लक्षात आले की ती चांगली एक हॅट मोठ्या मापाची आहे. बरे तर बरे. त्याचे मोठे मोठे कान त्यावेळी त्याला उपयोगी पडले. कारण त्यामुळे हेर खाली न सरकता तशीच वर कानाला टेकून बसे. नाहीतर ती सरळ नाकावर उतरून आली असती आणि मग समोरचे काही दिसलेच नसते."

हरी—"आई, एवढ्या लहान मुलाने एवढी मोठी हॅट घातली असेल तेव्हा तो किती विचित्र दिसत असेल. मी तिथे असतो तर आपल्या केमेऱ्याने त्याचा फोटो काढल्याशिवाय नक्कीच राहिलो नसतो."

आई—"होय बाळ, नक्कीच तो विचित्र दिसत असेल. इतर भारतीय मुलांच्या प्रमाणे मोहनदासने पण सुरुवातीला विलायतेत सढळ हाताने पैसे खर्च केले. तो नाचायला शिकला. व्हायोलिन वाजवायला शिकला. त्याने चांगल्या चांगल्या दुकानांत कपडे शिवले. सोन्याचे एक चांगले घड्याळ विकत घेतले. थोडक्यात म्हणजे पैशाची भरपूर नासाडी केली. पण त्याच्यात एक फार चांगला गुण होता. तो पै पैचा हिशोब ठेवायचा. एके दिवशी मोहनदासला वाटले की मी चैनीत आणि फॅशन करण्यातच वेळ घालविला तर अभ्यास केव्हा करणार? आणि कसा करणार? व मोठे बंधू पण किती दिवस पैसे पाठविणार? हा विचार येताच मोहनदासने हिशोबाची वही काढली आणि त्यातून जे जे त्याला महाग व निरर्थक वाटले ते सर्व त्याने सोडून देण्याचे ठरवले. बसमध्ये बसण्याचेसुद्धा त्याने शक्य तितके कमी केले. स्वस्त पण आरोग्याला हितकारक असे भोजन मिळावे म्हणून त्याने स्वयंपाक करणे शिकून घेतले आणि दोन मोठ्या मोठ्या खोल्यांऐवजी एका लहान खोलीत रहायला त्याने सुरूवात केली.


विलायतेत गांधीजी – वयाच्या अठराव्या वर्षी

"अभ्यासाबरोबर दुसऱ्या धर्माचे धर्मग्रंथ वाचण्याची आणि ते समजून घेण्याची संधी पण त्याला विलायतेत मिळाली. लहानपणी त्याच्या वडिलांकडे जैन, बौद्ध, पारसी, ख्रिस्ती, मुसलमान अशा सर्व धर्मांचे लोक येत असत आणि तासनतास ह्या धर्मावर चर्चा चालत असे. मोहनदास मुकाट्याने बसून ही धर्मचर्चा ऐकत असे. तेव्हापासून सर्व धर्मांकडे आदराने बघण्याचे तो शिकला होता. लहानपणापासून एक गोष्ट त्याच्या मनात ठसली होती की, प्रामाणिकपणा हे सर्व धर्माचे मूळ आहे आणि सत्याचे पालन केल्याशिवाय माणूस प्रामाणिक बनू शकत नाही.

"आजारी लोकांची सेवाशुश्रूषा करायचा नाददेखील त्याला विलायतेतच लागला. एका डॉक्टरांच्या मदतीने तो महारोग्यांची शुश्रूषा करण्याचे शिकला. थोड्या दिवसातच तो हे काम इतके छान शिकला की पाहणारे आश्चर्यचकित होऊ लागले."

हरी—"आई, एवढ्या लवकर तो हे काम कसे शिकला असेल?"

आई—"कारण ते काम शिकण्याचे त्याला वेड लागले होते. बाळ, कुठलेही काम करण्याची तीव्र इच्छा असेल तर ते काम लवकर आल्याशिवाय राहत नाही. नंतर तर गरिबासारखे राहून दु:खी माणसांची सेवा करण्यात मोहनदासाला खूप आनंद होत असे.

"मोहनदासाने आपल्या अनेक मित्रांच्या तोंडून पॅरिस शहराची प्रशंसा ऐकली होती. ते म्हणायचे को पॅरिस हे खूप मोठे स्वच्छ व सुंदर शहर आहे. मोहनदास भारतात येण्यासाठी परतला त्याच्या आधी काही महिने पॅरिसमध्ये एका खूपच मोठया प्रदर्शनचा तयारी चालली होती. एकाच वेळी पॅरिस शहर व प्रदर्शन दोन्ही पाहायला मिळेल असे समजून मोहनदास पॅरिसला गेला.

पॅरिसला जे प्रदर्शन भरले होते त्यांत प्रदर्शनाच्या मैदानाच्या मधोमध एक लोखंडाचा मनोरा उभा करण्यात आला होता. दिल्लीच्या कुतुबमिनाराच्या तिप्पट त्याची उंची होती. जे कोणी हे प्रदर्शन पाहावयास जात ते त्या मनोऱ्यावर हमखास चढायचे. त्या मनोराच्या टोकावर एक हॉटेल पण होते. लोक त्या हॉटेलात बसून खात-पीत आणि प्रदर्शन पाहण्याची मजा लुटीत. मोहनदासने देखील त्या मिनारावर चढण्याचे तिकीट घेतले आणि मिनारावर असलेल्या हॉटेलमध्ये फराळ केला.

"प्रदर्शन पाहिल्यावर मोहनदासाने पॅरिसची पाहण्यासारखी प्रख्यात स्थळे पाहिली. तेथील प्राचीन मंदिरे त्याला खूपच आवडली. त्यातल्या त्यात 'नेत्रदाम' चे चर्च तर त्याला खूपच आवडले. "

हरी—"लोखंडाचा तो उंच मनोरा त्याला खूप आवडला असेल नाही आई?"

आई—"कोण जाणे का, तो मनोरा मात्र त्याला आवडला नाही. हो एवढे खरे की त्याला पॅरिसच्या जुन्या इमारती खूप आवडल्या.

"बॅरिस्टरची परीक्षा पास झाल्यावर मोहनदासने मायदेशी परतण्याची तयारी सुरू केली. समुद्रातील वादळ व सोसाटयाचा वारा ह्यांचा सामना करीत त्याचे जहाज जुलै महिन्यांत मुंबईच्या किनाऱ्याला येऊन पोहोचले.

"बंदरावर त्याचे वडील बंधू त्याच्या स्वागतासाठी आले होते. मोहनदास आईला भेटण्यासाठी अधीर झाला होता. पण मुंबईला पोहोचताच वडील भावाकडून त्याला आई वारल्याचे कळले. घरी पोहोचल्यावर आपल्याला मिठी मारणारी व आपले प्रेमाने स्वागत करणारी आपली आई दरवाजात उभी नसणार हे समजल्यावर दुःखाने त्याच्या डोळ्यांसमोर अंधारी आली. पण मोहनदासचे मन खूप मजबूत होते. त्याने दुःखाचा एक शब्द देखील काढला नाही व ते दुःख त्याने गिळून टाकले."

हरी—“अरेरे, त्याने हे दु:ख कसे सहन केले असेल? दुसरा कोणी असता तर रडून रडून त्याचे डोळे सुजले असते.”

आई—“पण तो 'दुसरा कोणी' थोडाच होता? तो तर होता—मोहनदास करमचंद गांधी.”

# ६

**"मोहनदासच्या** मोठ्या भावाने त्याच्या ऑफीससाठी म्हणून अगाऊच मुंबईमध्ये एक घर भाड्याने घेऊन ठेवले होते. ह्या घरावर 'मोहनदास करमचंद गांधी' अशी पाटी लावून मोहनदासने बॅरिस्टर म्हणनू काम करण्यास सुरुवात केली, पण मुंबईत त्यांचा जम बसला नाही. सहा महिने जिवापाड मेहनत केल्यावर तेथील ऑफीस बंद करून ते राजकोटला गेले आणि तेथे स्वतःचे ऑफीस सुरू केले. तेथे त्यांना चांगले काम मिळायला लागले. पण त्याचे मन तेथे काही केल्या लागेना. तेथील लोकांचा खोटेपणा आणि विश्वासघात पाहून तेथील कामावरून त्याचे मन उडाले.

"पोरबंदर येथे दादा अबदुलांची कंपनी आणि गांधीकुटुंब यांच्यात चांगला घरोबा होता. याच वेळी दादा अबदुलांच्या कंपनीची आफ्रिकेत एक मोठी केस चालली होती. ह्या केसचे काम हाती घेण्यासाठी त्यांनी मोहनदास यांना डरबन येथे पाठविले.

"गांधी—अरे नव्हे, आता तर गांधीजी—दक्षिण आफ्रिकेला पोहोचले. तेथे त्यांनी पाहिले की येथील जग वेगळे आहे. तेथील फिरंगी (युरोपियन) गोरे लोक काळ्या लोकांना अनेक प्रकारे हैराण करीत असत. मजूर असो की नोकर, बॅरिस्टर असो की व्यापारी, कुठल्याही भारतीयाला ते कुली म्हणूनच बोलावीत आणि जे काळे लोक खरोखरीच कुलीचे अर्थात हमालाचे काम करीत असत त्यांच्याबरोबर तर ते जनावरापेक्षाही वाईट रीतीने वागत. काळ्या लोकांना, हॉटेलात उतरण्याचे तर दूरच, पण त्यांत जाण्याची देखील मनाई होती. फुटपाथवर कुठल्याही गोऱ्या माणसाबरोबर चालायची देखील त्यांना बंदी होती. कोणाही भारतीयाला फुटपाथवरूत धक्का मारून पाडून टाकणे ही अगदी सामान्य बाब होती. डोक्यावर पगडी घालून कोणाही इंग्रजांच्या समोर जायची कुठल्याही भारतीयाची मजाल नव्हती. आगगाडीत अथवा बगीमध्ये देखील इंग्रजांच्या बरोबर भारतीय बसू शकत नव्हते. अशा तर कितीतरी गोष्टी होत्या."

हरी—"आई, मग गांधीजींना तेथे राहणे खूप अवघड गेले असेल नाही?"

आई—"आफ्रिकेत गांधीजींना किती अडचणी सहन कराव्या लागल्या व त्यांना त्यांनी कसे तोंड दिले त्याचा तुला अंदाज यावा म्हणून मी तुला तिथली एक गोष्ट सांगते.

"एकदा डरबनहून प्रिटोरियाला जाण्यासाठी गांधीजी टांग्यात बसणार होते इतक्यात गाडीच्या गार्डाने येऊन त्यांना अडविले. त्याने त्यांना इंग्रज प्रवाशाबरोबर टांग्यात बसण्यास मनाई केली आणि बाहेर टांगेवाल्या जवळच्या बैठकीवर बसण्यास सांगितले. गांधीजींना काहीही करून प्रिटोरियाला पोहोचायचे होते. त्यामुळे ते टांगेवाल्या जवळच्या बाहेरच्या बैठकीवर बसले. तो गार्ड आत बसला आणि गाडी चालू झाली. थोडया वेळानंतर गार्ड पुन्हा आला आणि त्याने गांधीजींना टांगेवाल्याच्या जवळच्या बैठकीवरून उतरून त्याच्या पायाजबळ खाली जी जागा होती तिथे बसण्यास सांगितले. गांधीजींनी तिथे बसण्यास साफ नकार दिला. त्यामुळे गार्डाचे पित्त खवळले. काळा माणूस असे वागतो म्हणजे काय? म्हणून त्याने मागे पुढे न पाहता गांधीजींच्या वर शिव्यांचा, थप्पडांचा मारा केला. एवढ्याने त्याचे समाधान झाले नाही मग त्याने गांधीजींचा हात पकडून त्यांना गाडीतून खाली ढकलण्यासाठी त्यांचा हात ओढण्यास सुरुवात केली. गांधीजींनी धैर्याने गाडीच्या एकाबाजुला असलेल्या मुठीला जळवेसारखे घट्ट पकडून ठेवले. गार्डाने देखील त्यांना निर्दयपणे मारण्याचे व शिव्या देण्याचे चालूच ठेवले. गोरे प्रवासी देखील थोडा वेळ हा प्रकार पाहत राहिले. पण जेव्हा त्यांच्याने राहवले नाही तेव्हा त्यांनी गांधीजींना मारणाऱ्या व शिव्या देणाऱ्या गार्डाला अडविले आणि तसे करण्याबद्दल त्याला दोष दिला. गार्डाने पाहिले की गाडीतील गोरे प्रवासी देखील गांधीजींची बाजू घेत आहेत तेव्हा त्याने गांधीजींचा नाद सोडला आणि तो मुकाट्याने आपल्या जागेवर जाऊन बसला. गांधीजी मरता मरता कसेबसे वाचले आणि त्यांना पुन्हा एकदा टांगेवाल्या जबळची बैठक मिळाली.

"अरे तू तर रडायला लागलास? किती हळव्या मनाचा आहेस रे तू? गांधीजींनी दुसऱ्या लोकांसाठी ह्याहूनही अधिक दु:खे सहन केली होती. पण त्यांनी कधीही दु:खाचा एक चकार शब्दही काढला नव्हता. कोणी त्यांच्यावर अत्याचार करी तेव्हा त्यांना दु:ख जरूर व्हायचे पण ते

तुझ्यासारखे घाबरून रडत बसत नव्हते." हे ऐकताच हरीने लगेच शर्टाच्या बाहीने स्वत:चे डोळे पुसून टाकले.

"भारतीयांची अशी वाईट स्थिती पाहून गांधीजींनी ठरविले की दक्षिण आफ्रिकेत राहणारे हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिस्ती, पारसी वगैरे सगळ्यांनी एकत्र येऊन तेथील सरकारी अधिकाऱ्यापर्यंत स्वत:च्या तक्रारी पोहोचवल्या पाहिजेत. असा विचार करून त्यांनी सर्व भारतीयांना एकत्र केले आणि त्याचा परिणाम असा झाला की दक्षिण आफ्रिकेत तेथील काँग्रेसचा जन्म झाला.

"हरी, तुला साहजिकच वाटेल की, गांधीजी आफ्रिकेत गेले त्यापूर्वी पण तेथे भारतीय होते त्यांच्यावर गोरे लोक खूपच जुलूम करीत होते, तर मग गांधीजींच्या शिवाय दुसऱ्या कोणालाही त्याची परिस्थिती सुधारण्याचे का सुचले नाही? पण खरी. गोष्ट अशी आहे की दुसऱ्याची दु:खे पाहून विरघळणारे हृदय त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाकडे नव्हते. स्वत:चा जीव धोक्यात घालून ते शक्तिशाली माणसाच्या विरुद्ध अशक्त माणसाला मदद करीत, म्हणूनच त्यांनी दक्षिण आफ्रिकेत देखील दुबळ्या आणि दु:खाने पीडलेल्या भारतीयांची बाजू घेतली.

"लोकांची अशी सेवा केल्याने गांधीजींना तेथील प्रत्येक लहान मूलसुद्धा ओळखू लागले आणि तेथील भारतीय त्यांना गांधीभाई म्हणून हाक मारू लागले. त्यांना गांधीभाई असे संबोधण्यात लोकांच्या मनातील त्यांच्याबद्दलचे प्रेम आणि आदर दिसून येत होता. गांधीजींना अशा प्रकारची लोकप्रियता मिळाली, त्याचबरोबर त्यांची वकिली पण चांगली चालायला लागली आणि त्या क्षेत्रात पण ते चमकले.

"आता तेथील लोकांना असे वाटायला लागले की गांधीजींच्या शिवाय आपले चालणार नाही आणि आपली दु:खे पण संपणार नाहीत, तेव्हा त्यांनी सर्वांनी मिळून गांधीजीना सांगितले की, 'गांधीभाई, तुम्ही इथेच राहा. तुम्ही इथे राहून तुमची वकिली पण करू शकल. त्याचबरोबर भारतीयांची सेवा पण करू शकाल.' गांधीजींना लोकांचे हे म्हणणे पटले व त्यांनी दक्षिण

आफ्रिकेत राहण्याचे कबूल केले. दक्षिण आफ्रिकेत कायमचे रहायचे तर कस्तुरबा व मुलांना पण आणायला पाहिजे, असा विचार करून त्यांनी सहा महिन्यांची रजा घेतली व ते हिंदुस्थानला जायला निघाले.

"त्या काळी आफ्रिकेहून हिंदुस्थानला येण्यास चोवीस ते पंचवीस दिवस लागत. बोटीमध्ये काही न करता नुसतेच बसून राह्यला गांधीजींना कसे तरीच वाटायला लागले. तेव्हा त्यांनी एका मौलवींना शोधून काढले व त्यांच्याकडून उर्दू शिकायला सुरुवात केली.

"हिंदुस्थानात आल्यावर लगेच गांधींजींनी दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या भारतीयांची स्थिती किती वाईट आहे त्याची खरी कल्पना सर्व देशाला समजावून सांगण्यासाठी व्याख्याने देण्यास व वर्तमानपत्रांत लिहिण्यास सुरुवात केली. सर फिरोजशाह मेहता आणि गोखले यांच्या सारख्या पुढाऱ्यांनी त्यांची गोष्ट ध्यानात घेतली व त्यांना मदत करण्याचे वचन दिले. ते हिंदुस्थानात अशाप्रकारे लोकांना तयार करीत होते, तेवढ्यात दक्षिण आफ्रिकेहून त्यांना तारेने बोलविण्यात आले. तार मिळताच कस्तुरबांना व मुलांना घेऊन ते जायला निघाले. प्रवासात समुद्रावरील वादळाच्या अडचणी सोशीत व दूसऱ्या प्रवाशांची सेवा करीत करीत ते डरबन येथे पोहोचले."

हरी—"ठीक, मग काय झाले आई?"

आई—"हरी, तुला. आता भूक लागली असेल. दुपारचे जे काही उरले आहे ते गरम करून देते. ते तू आधी खाऊन घे. मग तुला बाकीची गोष्ट पुढे सांगते.

हरी—"नाही आई ! घरात इतर कोणी खाणार नसेल तर मलादेखील खायचे नाही. तू आपली गोष्ट पुढे चालू कर."

आई—"नाही बाळ, थोडेतरी खाऊन घे."

हरी—"नाही आई, मला मुळीच भूक नाही. मी तर गांधीजींची गोष्टच ऐकेन."

आई—"बरे. जशी तुझी इच्छा. तर आता पुढे ऐक."

## ७

**"इकडे** दक्षिण आफ्रिकेत भारतीयांची स्थिती किती वाईट आहे. तसेच गोरे लोक त्यांच्या बरोबर कसे वागतात ते हिंदुस्थानातील लोकांना समजावून सांगण्यासाठी गांधीजींनी येथे हिंदुस्थानात केलेली भाषणे तिकडे दक्षिण आफ्रिकेतील वर्तमानपत्रांत खुपच तिखटमीठ लावून प्रसिद्ध करण्यात आली.

हे सर्व वाचून तेथील गोरे लोक खूपच चिडले. त्यांना शक्य झाले असते तर गांधीजी डरबन बंदरावर उतरल्यावर लगेच त्यांनी गांधीजींचे वाटेल ते हाल केले असते, पण मारणाऱ्यापेक्षा वाचवणारा मोठा असतो. गांधीजी जहाजावरून उतरले, इतक्यात काही गोऱ्या मुलांनी व गुंडांनी त्यांना घेरले. त्यांनी गांधीजींवर दगड व सडक्या अंड्यांचा मारा केला. काही लोकांनी त्यांना थपडा मारल्या, व काहींनी लाथा मारायलाही सुरुवात केली. गांधीजींना चक्कर आली आणि शेजारच्या घराची खिडकी पकडून ते कसेबसे उभे राहिले. सुदैवाने त्यांच्या एका इंग्रज मित्राची बायको तेथून जात होती. तिने गांधीजींना पाहिले. गर्दीमधून वाट काढीत ती गांधीजींच्या जवळ आली आणि त्या टोळीच्या समोर उभी राहिली. आता गर्दी थोडीफार कमी झाली. तेव्हा त्या बाईने गांधीजींना त्यांचे मित्र रुस्तमजी ह्यांच्याकडे पोहोचविले. संध्याकाळ होताच काही गोऱ्यांनी रुस्तमजींच्या घराला घेरले. ते जोरजोरात गाणे म्हणायला लागले:

'चला आपण त्या गांधीला
चिंचेच्या झाडावर फाशी देऊ'

"हा दंगा पाहून गांधीजींच्या मित्रानी त्यांना गुपचूप रुस्तमजींच्या घरातून दुसरीकडे पाठवून दिले.

"गांधीजींना जर वाटले असते तर त्यांना त्रास देणाऱ्या गुंडांच्या विरुद्ध ते फिर्याद करू शकले असते व त्यांना शिक्षा पण करू शकले असते, पण नाही. लहानपणी वडिलांनी अहिंसेचा व प्रेमाचा जो धडा त्यांना शिकविला होता तो त्यांच्या नीट लक्षात होता. त्यांचा विरोध करणाऱ्या व त्यांना मारणाऱ्या गोऱ्या लोकांना आपली चूक समजावी व त्यासाठी त्यांना पश्चात्ताप वाटावा

म्हणून गांधीजी खूपच शांत राहिले. गांधीजीच्या अशा प्रकारच्या वागण्याने गोऱ्यांवर खूपच चांगला परिणाम झाला व त्यांच्या मनात भारतीयांबद्दल थोडी सहानुभूती उत्पन्न झाली.

"आफ्रिकेत बोअर लोक आणि इंग्रज यांच्यामध्ये जेव्हा लढाई झाली तेव्हा गांधीजींनी इंग्रजांना मदत केली. त्यांच्या जागी जर दुसरा कोणी असता तर इंग्रजांना मदत न करता त्यांनी भारतीयांबरोबर केलेल्या वाईट वागणुकीचा त्याने बदला घेतला असता. पण गांधीची असे कसे करतील? प्रेमाने वैरभावना शमविणे आणि वैऱ्याला देखील प्रेमाने जिंकणे हा त्यांचा नेहमीचा नियम होता. ह्याच शस्त्राच्या मदतीने त्यांनी दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या इंग्रजांचे मन जिंकले. आफ्रिकेच्या दुसऱ्या भागांत राहणाऱ्या भारतीयांच्या खरेपणाची व प्रामाणिकपणाची इंग्रजांवर खूप चांगली छाप पडली.

"गाधीजींना परमेश्वराने सर्वकाही दिले होते. बायको होती, मुले होती, आणि पैसा पण होता. असे असूनही त्यांच्या मनाला चैन नव्हता. गौतम बुद्धाप्रमाणे जगातील ऐषआराम त्यांना बोचू लागला. खूप विचार केल्यानंतर त्यांना वाटले की जगातील ऐषआरामात आणि मौजमजा सोडून साधे जीवन जगण्यातच खरा आनंद आहे. असा निर्णय केल्यावर त्यांनी आपली सर्व कामे स्वत:च करायला सुरवात केली. कपडे धुणे, केर काढणे, संडास साफ करणे, स्वयंपाक करणे, वगैरे कामे ते स्वत:च करू लागले.

"एक दिवस ते एका गोऱ्या न्हाव्याच्या दुकानात केस कापायला गेले. त्या काळी गोऱ्या लोकांना काळ्या माणसाबद्दल किती तिरस्कार होता ते तुला माहीत आहे. त्या गोऱ्या न्हाव्याने देखील तिरस्कारामुळे गांधीजींचे केस कापण्यास स्पष्ट नकार दिला. गांधीजी थोडीदेखील कुरकुर केल्याशिवाय सरळ घरी आले. घरी येऊन त्यांनी आपले विलायती पृद्धतीने कापलेले लांब केस कापून लहान करून टाकले. ह्यापूर्वी कधीही त्यांच्यावर स्वत:चे केस कापण्याची वेळ आली नव्हती, त्यामुळे केस असे काही लहान मोठे कापले गेले की जणू काही रात्री उंदरानेच त्यांचे केस कुरतडले असावेत. दुसऱ्या दिवशी अशा केसानिंशीच ते कोर्टात गेले. त्यांच्या असल्या हजामतीची मित्रांनी खूप टिंगल केली. पण गांधीजींना स्वत: केस कापावे का लागले हे जेव्हा त्यांना समजले

तेव्हा ते सर्व गप्प बसले. हा प्रसंग घडल्यानंतर गांधीजींनी इंग्रजी पद्धतीचे केस ठेवणे सोडून दिले. ते नेहमी स्वत:च आपले केस कापीत असत."

हरी—"आई ! स्वत:चे केस स्वत:च कापल्यावर जेव्हा गांधीजीनी आरशात पाहिले असेल तेव्हा त्यांना खूप हसू आले असेल नाही?"

आई—"हो. आलेच असेल ना ! ते कसे आनंदी व हसतमुख होते ते तू पाहिले आहेसच"

"ठीक, नंतर १९०२ मध्ये इंग्रज आणि बोअर लोकांमधले युद्ध संपले होते आणि वातावरण शांत झाले होते. आता त्यांना हिंदुस्थानची आठवण यायला लागली. हिंदुस्थानात जाऊन आपल्या देशाची सेवा करायची त्यांची उत्कट इच्छा होती. त्यांनी सामान बांधले आणि परत हिंदुस्थानात जाण्याची तयारी केली. त्याची परतफेड म्हणून त्यांनी त्यांना मूल्यवान वस्तु भेट म्हणून दिल्या.* कस्तुरबांनादेखील एक हार भेट म्हणनू देण्यात आला. ह्या सर्व भेटी गांधीजीनी तेथील काँग्रेसच्या कचेरीत जमा केल्या. अशा हेतूने की त्या सर्वांचा उपयोग लोकांच्या सेवेत व्हावा. त्यांचे असे मत होते की जनतेच्या सेवकांना अशा प्रकारच्या भेटी घेण्याचा किंवा त्या ठेवण्याचा मुळीच अधिकार नाही.

"१९०६ मध्ये गांधीजी हिंदुस्थानात आले. त्या वर्षी कलकत्त्यात काँग्रेसचे अधिवेशन होणार होते. त्याची जोरात तयारी चालली होती. सर्व भारतीयांना स्वतंत्र होण्याचा ध्यास लागला होता. गांधीजींनी पाहिले की भारतीयांमध्ये स्वतंत्र होण्याची इच्छा तर आहे, पण त्यांना एकोप्याने काम करण्याची सवय नाही. प्रत्येक जण आपले काम दुसऱ्यावर ढकलू पाहतो आणि लहानसहान कामे करायला लोकांना कमीपणा वाटतो. असे पाहिल्यावर गांधीजींनी काँग्रेसच्या अधिवेशनात व्यवस्था ठेवण्याचे काम घेतले आणि त्या ठिकाणी येणाऱ्या पाहुण्याच्या खोल्या वगैरे साफ करण्याचे काम त्यांनी आपल्याकडे घेतले. त्यांना हे काम करताना पाहून दुसऱ्या लोकानी पण त्यांना त्या कामात मदत करण्यात सुरवात केली. त्यानंतर त्यांनी महासभेच्या मंत्र्यांच्या हाताखाली कारकुनाचे काम पण केले. ह्याच अधिवेशनात त्यांनी भारताच्या पुढाऱ्यांना

आफ्रिकेत राहणाऱ्या भारतीयांच्या स्थितीची कल्पना दिली व त्यांच्यासाठी काँग्रेसची सहानुभूती मिळविली.

“महासभेची बैठक संपल्यावर ते थर्डक्लासच्या डब्यात बसून घरी आले. तेव्हापासून ते आजपर्यंत त्यांनी नेहेमी रेल्वेचा प्रवास तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत बसून केला. तसे केल्याने खर्च कमी होत असे व गरीब लोकांबरोवर बसून त्यांच्याशी बोलण्याची संधी पण मिळत असे. कलकत्त्याहून 'बनारस, आग्रा, जयपूर आणि पालनपूर असे करत करत ते राजकोटला पोहोचले. एवढ्यात प्रवासात त्यांचा केवळ ३१ रु. खर्च झाला होता. ते आपल्या बरोबर एक गरम कोट, एक धोतर, एक सदरा आणि टॉवेल एवढे मावेल अशी एक साधी पिशवी व एक खाण्याचा डबा असे सामान ठेवीत. हा डबा त्यांना गोखले ह्यांनी भेट दिला होता.”

हरी—“आई, ते पिशवीत साबण व दात घासायचा ब्रश वगैरे तर ठेवतच असतील ना?"

आई—“नाही बाळ, ते दात घासण्यासाठी नैसर्गिक ब्रशचा म्हणजे दांतणाचा उपयोग करीत."

---

* गांधीजीनी आफ्रिकेत राहणाऱ्या भारतीयांची जी सेवा केली होती.

# ८



सत्याग्रही गांधीजी – दक्षिण आफ्रिकेत

**"नुकतेच** मी ज्यांचे नाव घेतले ते श्री गोखले हिंदुस्थानचे एक खूप मोठे पुढारी होते. ते गांधीजींना आपले धाकटे भाऊ मानीत. त्यांच्याच सांगण्यावरून गांधीजींनी मुंबईला जाऊन पुन्हा वकिली सुरू केली. जेमतेम तीन-चार महिने झाले असतील तेवढ्यात गांधीजींना परत बोलावण्यासाठी आफ्रिकेहून तारा यायला लागल्या.

तेथील भारतीयांची अशी मागणी होती की गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत यावे, इंग्रज मंत्री मि. चेम्बरलेन ह्यांना भेटावे व भारतीयांच्या तक्रारींचा निकाल करावा. गांधीजींना वाटले की हे महत्वाचे काम आहे आणि त्यासाठी आपल्याला आफ्रिकेला गेलेच पाहिजे. ते लगेच तेथे जावयाला निघाले. त्यांनी तेथे जाऊन बॅरीस्टरीचे काम सोडले व एक वर्तमानपत्र सुरू केले. त्यांनी प्लेगाच्या तडाख्यांत सापडलेल्या रोग्यांची सेवा केली व मजुरांची सेवा करून त्यांची स्थिती सुधारली. त्याचबरोबर भारतीयांना बरोबरीचे अधिकार मिळावेत ह्यासाठी त्यांनी एक जोरदार चळवळ सुरू केली. ह्याच दिवसांत त्यांनी स्वत:चे मन शुद्ध करण्यासाठी व्रते केली व गीतेचे तेरा अध्याय पाठ केले. परमेश्वराच्या मार्गाला जावयाचे असेल तर माणसाने जगातला थाटमाट व ऐषआराम त्याचा त्याग केला पाहिजे ही गोष्ट त्यांच्या मनात बिंबली होती. सगळी माणसे समान आहेत. कोणी उच्च नाही, कोणी नीच नाही असे ते मानीत असत त्यामुळे गरिबांच्या बरोबर गरिबांसारखे होऊन त्यांच्या बरोबर मिळून मिसळून रहाण्याचे त्यांनी ठरविले. ह्यासाठी ते एका लहानशा गावात राहायला गेले आणि खेडेगावातील लोकांप्रमाणे साधे जीवन जगू लागले. वर्तमानपत्रपण तेथूनच प्रसिद्ध होऊ लागले.

गांधीजींच्या इंग्रज मित्रांवर ह्याचा एवढा परिणाम झाला की त्यांच्यातील तिघे त्यांच्याबरोबर त्या गावात राहू लागले.

"ह्या काळात आफ्रिकेच्या सरकारने आशियाच्या लोकांच्या विरुद्ध नवेनवे कडक कायदे पास करण्यासाठी सुरुवात केली. हे असह्य कायदे रद्द करण्यासाठी लोकांनी गांधीजींच्या सल्ल्याने सत्याग्रह सुरू केला. अहिंसक युद्धासाठी गांधीजींचे मोठ्यातमोठे शस्त्र सत्याग्रह होते. भारतीयांनी ह्या लढ्यात शांती, अहिंसा व बलिदान ह्यांच्या जोरावर सरकारच्या लाठ्यांचा व बंदुकींचा सामना केला. तुरुंगात जाणे म्हणजे जणू एक खेळच होऊन बसला. इ. स. १९०८ मध्ये गांधीजींना पहिल्यांदा कायदेभंगासाठी तुरुंगात जावे लागले. जनरल स्मट्स तिथले पंतप्रधान होते. वीस दिवस गांधीजींना तुरुंगात ठेवल्यावर त्यांनी त्यांना वाटाघाटीसाठी प्रिटोरीयाला बोलावले. आपल्या बरोबरच्या सर्व कैद्यांना सोडण्यात आले तरच मी सरकारबरोबर वाटाघाट करीन, असे गांधीजींनी कळविले. ह्या अटीप्रमाणे सर्व कैद्यांना सोडून देण्यात आले. जोहान्सबर्गमध्ये एक मशीद आहे. तेथे भारतीयांची मोठी सभा भरली. ह्या सभेत सरकारबरोबर तडजोड करण्याचा निर्णय करण्यात आला. पण काही उग्र स्वभावाच्या पठाणांना ह्या निर्णय आवडला नाही. त्यांच्यातील एकाने तर हा निर्णय घेतल्याबद्दल गांधीजींना मारले देखील ! गांधीजींच्या डोक्याला खूप इजा झाली."

हरी—"आई ! मग गांधीजींनी त्या पठाणाला शिक्षा करवली की नाही?"



गांधीजी – १९१५

आई—"नाही बाळ ! त्यांनी त्याच्या विरुद्ध फिर्याद करण्याससुद्धा नाही म्हटले. ते म्हणाले 'माझ्या रक्ताने भिजलेल्या पट्टीमुळे माझे वैरी पण माझ्या मैत्रीच्या बंधनात बांधले जातील आणि माझे मित्र बनतील. 'आणि हरी त्यांची ही गोष्ट अगदी खरी झाली त्यांना मारणाऱ्या पठाणाला ही गोष्ट समजली तेव्हा त्याला खूप पश्चात्ताप झाला. त्याने

गांधीजींची माफी मागितली आणि तो त्यांचा कायमचा मित्र झाला.

“१९१४ साली सारे जग युद्धाच्या मेघांनी घेरले गेले. ४ ऑगस्टला इंग्लंडने जर्मनीला लढाईचे आव्हान दिले आणि युद्ध पेटले. गांधीजींना वाटले की ह्यावेळी माझ्या देशाला माझ्या सेवेची जरूर असणार. तेव्हा मी तेथे जायला पाहिजे. ते आफ्रिकेहून लंडनला गेले आणि तेथे थोडे दिवस राहून हिंदुस्थानला आले. १९१५ सालच्या जानेवारी महिन्याच्या ९ तारखेला ते मुंबईला पोहोचले. त्याकाळी ते हिंदुस्थानच्या गिरणीमध्ये विणलेत्या कापडाचा कोट आणि धोतर नेसत असत आणि डोक्याला रूमाल बांधत असत.”

हरी—“कोट त्यांना मजेशीर दिसत असेल नाही? नंतर त्यांनी हा पोशाख केव्हा आणि का सोडून दिला?



आई—“हा पोशाख त्यांना शोभत होता खरा, पण १९१९ साली त्यांनी पाहिले की देशातील कितीतरी गरिबांना कोट तर राहू द्या सदरा पण घालायला मिळत नाही. तेव्हा त्यांनी हा पोशाख सोडून दिला. तेव्हा पासून देशातल्या अत्यंत गरीब माणसाचा पोशाख-फक्त एक लहान पंचा-ते नेसायला लागले. आणि सदरा व कोटाच्या ऐवजी आवश्यक वाटल्यास ते एक चादर पांघरायचे. हेच त्यांनी शेवटपर्यंत ठेवले. ”

# ९

**“इ.** स. १९१५ साली गोखल्यांच्या सल्ल्याने गांधीजींनी अहमदाबाद जवळ कोचरब नावाच्या गावी एक आश्रम सुरू केला. आश्रमच्या प्रत्येक सभासदाला अशी शपथ घ्यावी लागे की, 'मी खोटे बोलणार नाही, अहिंसेवर विश्वास ठेवीन, साधे जेवण घेईन, चोरी करणार नाही, माझ्या स्वत:साठी पैसे जमा करणार नाही, कोणाला घाबरणार नाही, स्वदेशी वस्तू वापरीन, हाताने कातलेल्या सुताची हाताने विणलेली खादी वापरीन, हिंदुस्थानच्या भाषेमध्ये विद्येचा प्रसार करण्याचा आणि अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न करीन.'

“कोचरब आश्रमात अस्पृश्य लोक आणि उच्च जातीचे लोक बरोबर राहायचे. त्यांचे खाणेपिणे, उठणेबसणे सगळे बरोबर व्हायचे. तेथे सगळे समान होते. कोणी उच्च नाही व कोणी नीच नाही. आश्रमात राहणाऱ्यांना सुरुवातीला असे राहणे जरा विचित्र वाटत असे. पण नंतर सगळ्याना सवय झाली. आपल्या देशात ह्यापूर्वी असे कोठून झाले असणार? पुष्कळ लोकांना हे काही बरोबर होत नाही असेच वाटायचे. जे श्रीमंत लोक आश्रमाला पैशाची मदत करीत असत त्यांनी मदत करणे बंद केले. एक दिवस असा उगवला की आश्रम चालवायला गांधीजींजवळ दमडीपण उरली नाही. त्यांना काळजी वाटायला लागली. संध्याकाळच्या सुमारास ते उदास होऊन बसले होते. तेवढ्यात एकदम एक अनोळखी माणूस आश्रमात आला आणि तो तेरा हजार रुपयांची रक्कम देऊन आल्या पावली निघून गेला. जे देवाचे खरे भक्त आहेत, अल्लाचे बंदे आहेत त्यांना अडचणीच्या वेळी अशा रीतीने मदत मिळत असते.

“गांधीजींचे काम, त्यांचा खरेपणा, त्यांचा प्रामाणिकपणा आणि त्यांचा त्याग पाहून रवीन्द्रनाथ टागोरांनी त्यांना 'महात्मा' म्हणायला सुरुवात केली. नंतर तर सगळा देश त्यांना 'महात्मा' ह्या नावानेच ओळखू लागला. महात्माजी जेथे जात तेथे हजारो लोक त्यांच्या दर्शनासाठी येऊ लागले. सर्वजण त्यांच्या पाया पडत व त्यांची पायधूळ कपाळाला लावत.

"लोकांचा इंग्रजांच्या बद्दलचा तिरस्कार ह्यावेळी वाढत चालला होता आणि लोक त्यांच्यामुळे त्रासून गेले होते. लोकांमध्ये धैर्य आणि उत्साह निर्माण व्हावा असे गांधीजींना जरुर वाटायचे. परंतु इंग्रजांच्या बद्दलचा त्यांचा द्वेष त्यांना पसंत नव्हता. हा द्वेष कोणत्याही प्रकारे लोकांच्या मनातून निघून जावा अशी त्यांची इच्छा होती. इंग्रज सरकारच्या बरोबर टक्कर घेणे हा काही पोरखेळ नव्हे, ह्याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यासाठी त्यांना संपूर्ण देशातील सगळ्या लोकांची मदत घेणे आवश्यक होते. म्हणून त्यांनी गरीब शेतकरी व मजूर ह्यांची स्थिती सुधारण्यासाठी काम करायला सुरुवात केली. त्यांच्या सेवेत ते स्वत:ला देखील विसरले.

इंग्लंड आणि जर्मनी ह्यांच्यामधील लढाई ह्या काळात अगदी जोरात चालली होती आणि इंग्रजांना ह्या लढाईत हिंदुस्थानच्या लोकांच्या मदतीची खूप जरूर होती त्यांनी गांधीजींना आपल्याला मदत करण्यासाठी समजावले. इंग्रज हिंदुस्थानच्या लोकांबरोबर ज्याप्रमाणे वागत होते ते पाहता दुसरा कोणी असता तर त्याने त्यांना मदत केली नसती. पण गांधीजी तर शत्रूंच्या अडचणीचा फायदा घेण्यात मानीत नव्हते. मग इंग्रजांच्या आगतिकपणाचा फायदा पण ते कसे घेतील? ते तर इंग्रजांचे काम करून त्यांना उपकाराच्या ओझ्याखाली दडपून त्यांच्याकडून हिंदुस्थानसाठी स्वराज्य मिळविण्याची इच्छा करीत होते. शिवाय त्यांना असेही वाटे की भारतीयांच्यावर इंग्रज जे अत्याचार करीत आहे ते वास्तविक इंग्रजांच्या रक्तात नाही. असे करणारे म्हणजे फक्त हिंदुस्थानात येऊन राज्य करणारे काही इंग्रज अधिकारी आहेत. बाकी इंग्रजांना आपण प्रेमाने जिंकू शकू असे त्यांना वाटे. असे वाटत असल्यामुळे गांधीजी स्वत: गावोगावी फिरले आणि लोकांना युद्धासाठी सैन्यात भरती होण्यासाठी सांगू लागले. ह्या कामासाठी त्यांनी रात्रीचा दिवस केला. ह्या कामात त्यांनी एवढे कष्ट केले की शेवटी ते आजारी पडले. ते आजारपणातून उठण्या अगोदरच युद्ध संपल्याची बातमी मिळाली आणि भरतीचे काम बंद करण्यात आले. ह्याच आजारपणात गांधीजींनी शेळीचे दूध घ्यावयाला सुरुवात केली. तेव्हा पासून शेळीचे दूध आणि उकडलेल्या भाज्या हाच त्यांचा आहार झाला. आणि तोच त्यांनी शेवटपर्यंत चालू ठेवला."

हरी—"लढाई संपल्यामुळे महात्माजी आणि देशातील सगळ्या लोकांना खूप आनंद झाला असेल नाही आई?"

आई—"जगात मारामारी आणि कापाकापी बंद झाली. त्यामुळे सगळ्या लोकांना आनंद झाला खरा. पण आपल्या देशाची स्थिती त्यावेळी जरा विचित्रच होती. सगळ्या लोकांना वाटत होते की लढाई बंद होताच आपण इंग्रजांसाठी जे बलिदान दिले त्याच्या बदल्यात आपल्याला थोडेसे स्वातंत्र्य नक्कीच मिळेल आणि त्यामुळे शांतीचे आणि आनंदाचे दिवस येतील. पण स्वातंत्र्य कसले नी काय? इंग्रजांनी तर शांतीच्या ऐवजी आपल्यावर पहिल्यापेक्षापण अधिक जुलूम करावयास सुरुवात केली. आपल्या मोठ्यामोठ्या नेत्यांना लहान-सहान कारणांवरून पकडून तुरुंगात डांबून ठेवण्यासाठी आवश्यक असे कायदे इंग्रज सरकारने पास केले. अशा जुलमाच्या विरुद्ध कलकत्यापासून कराचीपर्यंत आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सगळ्या देशात रोषाची आणि रागाची लाट उसळली. गावोगावी सभा झाल्या आणि भाषणे झाली. लहान मुले, म्हातारी माणसे, स्त्री-पुरुष, हिंदु-मुसलमान सर्वजण अशा जुलमी कायद्यांचा भंग करण्यात तसेच वेळ आल्यास देशासाठी तन-मन-धन द्यावयाला तयार झाले.

"गांधीजी बरे झाले व हिंडू—फिरू लागले. त्यांनी प्रेमाची ज्योत पेटवली व अंधारात प्रकाश पसरविला. देशातील सर्व लोकांनी एक होऊन इंग्रजांजवळ स्वराज्याची मागणी केली. गांधीजी सर्वांचे पुढारी बनले. त्यांनी एक गोष्ट स्पष्ट केली की इंग्रजांविरुद्धच्या लढ्यांत हिंसेचे नावसुद्धा असता कामा नये. आपण फक्त शांतीने आणि अहिंसेने हा लढा देऊ इच्छितो. हिंदु-मुसलमान वगैरे सगळे खांद्याला खांदा भिडवून इंग्रज सरकार विरुद्ध लढण्यास तयार झाले. गांधीजींनी असा एक दिवस ठरविला की ह्या दिवशी सबंध देशामध्ये हरताळ पाडायचा आणि सबंध देशात त्या दिवशी कामे बंद ठेवायचे. हिंदु-मुसलमान सगळ्यांनी त्या दिवशी उपास किंवा रोजा करायचा. मंदिरात, मशिदींत आणि गुरुद्वारांत ईश्वर आपल्या देशाला स्वतंत्र करो ह्यासाठी प्रार्थना करायची.

"हरताळ आणि त्या दिवशीच्या कार्यक्रमाची बातमी सर्व देशभर पसरली. सरकारला असली गोष्ट कशी आवडणार? तेव्हा आपल्या कामात अडथळा आणण्यासाठी आणि दाबून टाकण्यासाठी त्यांनी तऱ्हतऱ्हचे अत्याचार करणे सुरू केले. अमृतसरच्या जालीयनवाला बागेत भरलेल्या सभेवर 'जनरल डायरच्या' हुकुमाने गोळ्या झाडण्यात आल्या. शेकडो नि:शस्त्र पुरुष, स्त्रिया, मुले, तरुण मंडळी, त्याचप्रमाणे वृद्ध त्याला बळी पडले. पंजाबमध्ये हजारो लोकांना पकडून तुरुंगात डांबून ठेवण्यात आले.

"पोस्ट, तार आणि रेल्वे सर्वच बंद असल्यामुळे पंजाबची ही बातमी गांधीजींना त्या दिवशी कोठून मिळणार? पण असली गोष्ट थोडीच लपून रहणार आहे? थोड्याच दिवसात पंजाबमधील अत्याचार आणि तेथील लोकांवर  बेतलेल्या प्रसंगाची बातमी कशी का होईना गांधीजींपर्यंत पोहोचल्याशिवाय राहिली नाही. ही दु:खद गोष्ट ऐकल्याबरोबर त्यांचे हृदय भरून आले आणि दु:खी मनाने ते पंजाबच्या मदतीसाठी जावयाला निघाले. परंतु ते अमृतसरला पोहोचण्यापूर्वी सरकारने रस्त्यातच त्यांना अटक केली आणि परत मुंबईला आणून त्यांना सोडून दिले.

"इंग्रज साम्राज्याची सगळी शक्ती गांधीजींना दाबून टाकण्याच्या कामी लावण्यात आली. परंतु अशा जुलूम जबरदस्तीने गांधीजी काही हिंमत हारणारे नव्हते. त्यांनी पहिल्यापेक्षाही अधिक निर्भय बनून आपले काम चालू ठेवले. आणि देशातल्या सगळ्या जातींना एकत्र करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यांच्या परिश्रमांना यश मिळाले. हिंदू आणि मुसलमान नेते एका झेंड्याखाली एकत्र झाले. खरे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी दोन्ही जमातींना एकत्र करण्याव्यतिरिक्त अजून दुसरी पुष्कळ तयारी करणे बाकी होती. गांधीजी असे मानीत की निर्बलांच्या मनातून बलवानांच्या बद्दलची, गरिबांच्या मनातून श्रीमंतांच्या बद्दलची, हरिजनांच्या मनांतून ब्राह्मणांच्या बद्दलची आणि शेतकऱ्यांच्या मनांतून जमीनदारांच्या बद्दलची भीती नाहिशी होईल, तसेच जेव्हा भारतीयांच्या मनांतून इंग्रजांच्या बद्दलची भीती नाहिशी होईल तेव्हाच खरी स्वतंत्रता मिळाली असे म्हणता येईल. म्हणून त्यांनी त्यासाठी प्रयत्न सुरू केले. ते नेहमी आवर्जून सांगत की लोकांच्या मनांतून

कोणत्याही प्रकारची भीती दूर करण्यासाठी व त्याचप्रमाणे त्यांना स्वतंत्र करण्यासाठी सत्य आणि अहिंसेचे पालन सर्वांत अधिक आवश्यक आहे.

"आजपासून २००० वर्षांपूर्वी महात्मा बुद्धाने हिंदुस्थानातील लोकांना अहिंसेचा जो धडा शिकविला होता तोच धडा महात्माजींनी पुन्हा शिकविला. ते म्हणत की कोणाचाही प्राण घेणे हे सर्वांत मोठे पाप आहे. त्याचबरोबर ते असेही म्हणत की सगळ्यांनी आपल्या देशाच्या व स्वत:च्या स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे. पण ही लढाई आपण जीवघेण्या हत्यारांनी नव्हे तर अहिंसेने व शांतीने लढू. झोपी गेलेल्या भारतीयांना त्यांनी हलवून हलवून जागे केले. स्वतंत्र्यासाठी जागृत करण्याकरता त्यांनी गावोगावी आपले कार्यकर्ते पाठविले. हे कार्यकर्ते लोकांना कातायला, विणायला तसेच लिहायला वाचायला पण शिकवित. लोकांनी अस्पृश्यता मानू नये, त्याचप्रमाणे दारू पिऊ नये ह्यासाठी ते प्रचार पण करीत जे काम दुसऱ्याने करावे अशी महात्माजींची इच्छा असे ते काम ते स्वत:आधी करीत. म्हणून लोकांना त्यांनी कातायला सांगितले त्याचबरोबर ते स्वत: पण कातण्यास शिकले. तुला आश्चर्य वाटेल की थोड्याच दिवसात ते दोन्ही हातांनी सूत कातायला शिकले.

"ह्याप्रमाणे महात्माजी हिंदुस्थानच्या लोकांना जागे करून स्वराज्याच्या लढ्यासाठी तयार करीत होते. तेवढ्यात अशी बातमी आली की इंग्लंडच्या राजाचा ज्येष्ट राजपुत्र हिंदुस्थानच्या भेटीसाठी येत आहे. ह्याप्रसंगी लोक त्याचे कोणत्याही प्रकारे स्वागत करू इच्छित नव्हते. सरकार स्वत:ची ऐट दाखविण्यासाठी 'प्रिन्स ऑफ वेल्स'ला येथे बोलावत आहे, अशी त्यांची तक्रार होती. सर्वानी ठरविले की कोणीही मिरवणुकीत अथवा सभेत भाग घ्यायचा नाही. त्यामुळे एकीकडे जेव्हा प्रिन्स ओफ वेल्सची मिरवणुक मुंबईच्या शुकशुकाट असलेल्या बाजारातून जात होती त्यावेळी दुसरीकडे लोकांनी परदेशी कपड्यांचे ढीग करून त्यांची होळी करण्याचा कार्यक्रम सुरू केला होता. कारण त्याकाळी स्वदेशी माल वापरण्याचा खूप प्रचार चालला होता.

"हा कार्यक्रम खूप शांतपणे चालत होता त्यावेळी अहमदाबाद आणि मुंबईमधील माथेफिरू लोकांनी आवेशात येऊन दंगे केले. काही इंग्रजांवर दगडफेक करण्यात आली. ज्या

पारशी लोकांनी राजपुत्राच्या स्वागतात भाग घेतला होता त्यांना मारण्यात आले. ट्राम तोडल्या आणि दारूच्या दुकानांमधे घुसून त्यांची अगदी नासधूस केली. गांधीजींना जेव्हा ही गोष्ट कळाली तेव्हा दंगे शांत करण्यासाठी ते स्वत: मोटारीत बसून निरनिराळया ठिकाणी फिरले.

“एका ठिकाणी त्यांनी जखमी झालेल्या शिपायांना खाटेवर बेशुद्धअवस्थेत पडलेले पाहिले. गांधीजींनी मोटार थांबविली व ते खाली उतरले. ते उतरताच लोकांनी त्यांना घेरले आणि ते सगळे 'महात्मा गांधीकी जय' अशी घोषणा करू लागले आपल्या नावाने अशा प्रकारचे दंगे आणि अत्याचार होत आहेत हे पाहून त्यांना खूपच वाईट वाटले. त्यांनी लोकांना थोड्या कडू पण स्पष्ट गोष्टी सांगितल्या आणि समजाविले की इंग्रज सरकारबरोबर अशा रीतीने लढण्यात गांधी आणि अहिंसा दोघाचाही पराजय आहे. हिंसेने मिळालेल्या स्वातंत्र्याची मला मुळीच जरूर नाही गांधीजींची ही गोष्ट लक्षात येताच लोकांना आपण केलेल्या कामाबद्दल पश्चात्ताप झाला. गांधीजींनी त्या जखमी शिपायांना इस्पिताळात पोहोचविले. एकीकडे गांधीजी लोकांना अशा रीतीने समजावून शांत करीत होते तर दुसरीकडे शहरातील एका भागात निघालेल्या मिरवणुकीवर पोलीसांनी गोळीबार केल्याची बातमी आली ही बातमी पसरताच शहरात हाहाकार माजला आणि ठिकठिकाणी दंगे सुरू झाले भडकलेल्या लोकांच्या झुंडीनी ठिकठिकाणी दुकाने तोडली व त्याचप्रमाणे बस व ट्राम ह्यांना आग लावली. लोकांनी जे करू नये ते केले.

“लोकांना अशा तऱ्हेने बिथरलेले पाहून गांधीजींनी उपास करण्याचे ठरविले. ते म्हणाले, “लोकांनी ज्या प्रकरचे वर्तन केलेले आहे ते योग्य नाही आणि त्याची शिक्षा मी स्वत: भोगीन. आपण अहिंसा व्रताचा भंग केला आहे. ज्या हिंदु-मुसलमान बंधूंनी ह्या व्रताचा भंग केला आहे व ज्यांनी आपल्या पारशी, ख्रिस्ती व इंग्रज बंधूंना त्रास दिला आहे त्यांनी त्यांची क्षमा मागितली पाहिले. जोपर्यंत ते त्यांची क्षमा मागणार नाहीत तोपर्यंत मी उपास सोडणार नाही.

“आणि शेवटी गांधीजींना पाहिजे होते तसेच झाले. सर्व पक्षांचे नेते एकत्र होऊन गांधीजींकडे आले आणि त्या सर्वानी गांधीजींना सांगितले की प्रत्येक मारामारी करणाऱ्याने ज्यांना त्रास दिला होता त्यांची माफी मागितली आहे, आणि मान्यपण केली आहे. नेत्यांकडून

अशा प्रकारची खात्री मिळाल्यावरच गांधीजींनी उपास सोडला. त्या दिवसापासून त्यांनी जोपर्यंत हिंदुस्थानला स्वराज्य मिळणार नाही तोपर्यंत दर सोमवारी मौन पाळण्याचे व्रत घेतले."

हरी—"आई, गांधीजी दर सोमवारी कशा करता मौन पाळीत असत?"

आई—"त्यामुळे त्यांना खूप विश्रांती मिळत असे. त्यांना चिंतन व मनन करण्यास पाहिजे असलेला वेळ मिळत असे. शिवाय त्यांच्या वर्तमानपत्रासाठी लेख वगैरेपण ते त्या दिवशी लिहू शकत असत."

# १०

**“गांधीजी** अहिंसक लढा चालू ठेवावा की नाही ह्या विषयी विचार करू लागले. मुंबईचे दंगे पाहून त्यांना वाटले की अजून लोक अहिंसक लढ्यासाठी पुरेसे तयार झालेले नाहीत. लढा चालू असताना ते आवेशात येऊन दंगा करतील अशी त्यांना भीती वाटे. परंतु दुसऱ्या शहरांत मुबईसारखे घडले नव्हते. तेथून बातम्या आल्या की सत्याग्रह आणि हरताळाच्या वेळी लोकांनी संपूर्ण शांतता पाळली होती. सर्व देशातून अशा बातम्या आल्यावर त्यांनी लढा चालू ठेवायाचे ठरविले.

“हरताळानंतर पुष्कळ लोकांनी परदेशीमाल वापरण्याचे सोडून दिले परदेशी मालाच्या अशा बहिष्काराने इंग्लंडच्या पुष्कळ कारखान्यानां खूप नुकसान सहन करावे लागले. परदेशी मालाच्या बहिष्काराची ही चळवळ दाबून टाकण्यासाठी सरकारने आपल्या मोठयामोठया पुढाऱ्यांना अटक केली व त्यांना तुरुंगात डांबून ठेवले. मोतीलाल नेहरु, देशबंधू चित्तरंजनदास, लाला लाजपतराय, मौलाना आझाद तसेच दुसरे शेकडो देशभक्त ह्या चळवळीत तुरुंगात गेले होते.

“अशा परिस्थितीत दुसरे कोणी असते तर भीतीने त्याची गाळण उडाली असती व तो हातपाय गाळून बसला असता. परंतु गांधीजींनी स्वातंत्र्याचा झेंडा फडकत ठेवला आणि सरकारचा सामना करण्यात थोडी देखील पिछेहाट केली नाही. त्यांनी व्हॉईसरॉयला आपल्या पुढाऱ्यांना सोडून देण्यासाठी वारंवार विनंती केली. पण व्हॉईसरॉयनी तसे करण्यास नकार दिला.

“स्वातंत्र्याचा लढा जोरात चालू होता. लढ्यात विजय आपला होईल असे वाटले होते. एवढ्यात अचानक बातमी आली की महात्माजींनी लढा थांबविला आहे. अचानक लढा का थांबविण्यात आला ते कोणाला कळले नाही. महात्माजी इंग्रजांना घाबरून गेले, महात्माजींनी इंग्रजांबगोबर तडजोड केली अशा तऱ्हेतऱ्हेच्या अफवा पसरायला लागल्या. परंतु जे समजूतदार होते त्यांना खरी हकीकत काय असावी ह्याचा अंदाज आला होता.”

हरी—"आई ! खरी गोष्ट काय होती? गांधीजींनी लढा का थांबविला?"

आई—"त्याचे असे होते की स्वातंत्र्याच्या लढ्याच्या सुरुवातीपासूनच गांधीजींनी अहिंसेचे तत्त्व लक्षात ठेवण्यासाठी लोकांना अनेकवेळा समजाविले होते. इंग्रज साम्राज्यासारख्या जबरदस्त साप्राज्याविरुद्ध लढणे म्हणजे काही साधी सुधी गोष्ट नव्हती. शिवाय लोक सरकारचा सामना करतील तेव्हा सरकार लोकांना दंड करेल, त्यांच्यावर लाठी चालवेल आणि गोळीबार करेल, ही गोष्ट पण गांधीजी जाणून होते. अशा वेळीदेखील शांत राहणे ही अहिंसेची खरी कसोटी आहे. संपूर्ण देशभर ठिकठिकाणी लोक सविनय कायदेभंग करीत होते आणि त्याच्या बदल्यात मिळणारा पोलीसांचा लाठीमार देखील शांतपणे सहन करीत होते. परंतु उत्तर-प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा गावी ह्याच्या उलट घडले. तेथील काही तरुणांनी पोलीसांच्या लाठीचे उत्तर मारामारी करून दिले. त्यांनी एका पोलिस चौकीला आग लावली आणि ती जाळून टाकली. २१ शिपाई त्यात जळून मेले. त्या लोकांच्या अशा वागण्याने महात्माजींना फार दु:ख झाले. त्यांनी लढा बंद करण्याचा आदेश दिला आणि म्हटले की 'हिंसेचा द्वारा म्हणजेच एका माणसाला देखील मारुन किंवा त्रास देऊन मिळवलेल्या स्वातंत्र्याचा माझ्यामते काहीही उपयोग नाही; अशा तऱ्हेने स्वतंत्र होण्यापेक्षा तर गुलामी हजारपटीने चांगली.' त्यांनी चौरीचौराच्या घटनेबद्दल स्वत:लाच जवाबदार धरले आणि म्हटले की आपल्या देशातील लोक अजून अहिंसेचा खरा अर्थ समजले नाहीत आणि जोपर्यंत ते अहिंसेचे खरे स्वरूप समजणार नाहीत तोपर्यंत ते सत्याग्रह करू शकणार नाहीत. सत्याग्रहासाठी सत्य, नम्रता, धैर्य, योग्य समज, त्याग तसेच शत्रू अथवा मित्र सगळ्याबद्दल प्रेमभाव ठेवण्याची शक्ती आवश्यक आहे.

"अशा रीतीने स्वत:च्या आणि आपल्या देशवासीयांच्या चुकीची स्पष्ट कबुली देऊनच ते थांबले नाहीत, तर त्यांनी प्रायश्चित्त म्हणून पाच दिवसांचा उपास करण्याचे ठरविले. हा उपास करण्यासाठी ते मुंबईहून परत साबरमती आश्रमात आले. तेथे राहून सर्व देशात अहिंसेचा प्रचार करण्याची त्यांची इच्छा होती, पण ते साबरमतीला पोहोचले आणि चौथ्या दिवसी त्यांना सरकारने अटक केली. ते तुरुंगात गेले त्या दिवशी कस्तुरबा ह्यांनी देशवासीयांना परदेशी कपड्यांचा

बहिष्कार करुन स्वदेशी कपडे घालण्याचा, कातण्याचा, अस्पृश्यता निवारण करण्याचा व देशाचा प्रगतीसाठी कामात गुंतून जाण्याचा आदेश दिला.

"गांधीजींनी तुरुंगात सर्व अडचणी हसतमुखाने सहन केल्या. तुरुंगात ते रोज सकाळी उठून गीता वाचीत. दुपारच्या वेळी ते कुराण वाचीत. संध्याकाळी एका चिनी ख्रिश्चन माणसाबरोबर ते बायबल वाचीत आणि सूत कातीत. ह्या व्यतिरिक्त जो वेळ उरायचा ह्यात: ते उर्दू आणि तामीळ ह्या दोन भाषा वाचण्यास व लिहिण्यास शिकले.

त्यावेळी गांधीजी आपल्या डोळ्यासमोरून दूर होते पण आपल्यापैकी प्रत्येकाच्या मनात त्यांचे नाव नेहमी घोळत असे. त्यांना तुरुंगात जाऊन दोन वर्षे पण झाली नसतील तेवढ्यात त्यांची तब्येत खूप बिघडली आणि ते आजारी पडले. त्यांच्या आजाराच्या बातमीने सबंध देश काळजीत पडला. सरकारने त्यांना सहा महिन्यापर्यंत तुरुंगातच ठेवले आणि सहा महिन्यानंतर गांधीजी बरे होतील असे कोणतेही चिन्ह न दिसल्यामुळे त्यांना पुण्याच्या सरकारी इस्पिताळात पाठवून देण्यात आले. तेथील एका मोठ्या डॉक्टरांनी गांधीजींचे ॲपेंडिक्सचे ओपरेशन केले. थोड्या दिवसांनी ते वाचतील अशी बातमी साऱ्या देशात पसरली आणि लोकांच्या आनंदाला सीमा राहिली नाही.

"फेब्रुवारीच्या सुरुवातीला सरकारने गांधीजींना जेलमधून सोडले आहे अशी बातमी आली. तुरुंगातून सुटल्याबरोबर गांधीजींनी त्यावेळचे काँग्रेसचे अध्यक्ष श्री मौलाना महंमद अली याना एक पत्र लिहिले ह्या पत्रात त्यांनी कळविले होते की 'अशा प्रकारे सुटल्याने मला मुळीच आनंद झाला नाही, जोपर्यंत सहा वर्ष पूर्ण होत नाहीत तोपर्यंत मी स्वत:ला सरकारचा कैदी समजेन आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात सरकारच्या विरुद्ध अजिबात लढणार नाही.

"पुण्याच्या इस्पितळातून गांधीजींना मुंबईजवळ जुहूच्या समुद्रकिनारी पाठविण्यात आले. येथे त्यांची तब्येत सुधारायला लागली. जुहूमध्ये मोतीलाल नेहरु, देशबंधू चित्तरंजनदास आणि पंडित जवाहरलाल नेहरु वगैरे सर्वच पुढारी त्यांना भेटायला येत. त्या सर्वांना देश स्वतंत्र

करण्याचा ध्यास लागला होता. गांधीजी तासन्तास त्यांच्याबरोबर स्वराज्याच्या गोष्टी करीत. त्यांना एक गोष्ट स्पष्ट दिसत होती की जोपर्यंत आपल्या देशातून गरिबी, अज्ञान, स्पृश्य-अस्पृश्यांमधील भेदभाव आणि बेकी दूर होणार नाही तोपर्यंत देश पुढे येऊ शकणार नाही व त्याचप्रमाणे गुलामीची बंधने पण दूर होऊ शकणार नाहीत.

“तब्येत चांगली होताच गांधीजींनी हिंदुस्थानची स्थिती सुधारण्यासाठी अथाग प्रयत्न सुरू केले. जर लोक कातणे आणि विणणे शिकतील तर ते परदेशी कापड वापरणे बंद करतील. एवढ्यासाठी ठिकठिकाणी लोकांना कातणे आणि विणणे शिकविण्याचे सुरू करण्यात आले. दारुबंदी आणि अस्पृश्यता निवारणाचा प्रचार पण करायला त्यांनी सुरुवात केली. दुही दूर करण्यासाठी गांधीजींनी देशभर स्वत: प्रवास केला.

“गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे करून दाखविले. ते सरकारच्या विरुद्ध लढले नाहीत पण सरकारला अशी भीती होती की जर हिंदू, मुसलमान, पारशी आणि ख्रिस्ती सगळे स्वराज्य मिळविण्यासाठी एका झेंड्याखाली एकत्र झाले तर वाटेल तेवढे मोठे सरकार असेल तरी ते त्यांच्यासमोर टिकू शकणार नाही. म्हणून काही सरकारी अधिकाऱ्यांनी हिंदू व मुसलमान ह्या दोहोंच्यामधे फूट पाडून त्यांची एकी तोडण्याचे कारस्थान सुरू केले."

हरी—“आई ! पण हिंदु आणि मुसलमान अशा अधिकाऱ्यांची गोष्ट मानून त्यात अडकले का?"

# ११

**आई—"हरी !** दोन माणसांमध्ये तिरस्कार उत्पन्न करणे व त्यांच्यामध्ये फूट पाडणे किती सोपे आहे. आणि दोन माणसांना जोडणे त्यांच्यामध्ये प्रेम उत्पन्न करणे किती अवघड आहे हे काय तुला माहीत नाही? मूर्ख हिंदू आणि मूर्ख मुसलमान आपला रस्ता चुकले, गांधीजींचा प्रेमाचा संदेश ते बिसरले. एकमेकाबरोबर भांडू लागले आणि थोड्याच वेळात स्वातंत्र्याचे ध्येय डोळ्यासमोरून दूर झाले.

"हिंदू आणि मुसलमानांना अशा रीतीने भांडताना व एकमेकांचा रक्तपात करतांना पाहून महात्माजींना अपार दु:ख झाले. दिल्लीमधे हिंदू आणि मुसलमानांमध्ये असा दंगा झाला म्हणून महात्माजी तेथे गेले आणि त्यांनी तेथे २९ दिवसांचा कडक उपास केला. आपल्या उपासाने व प्रार्थनेने ते लोकांमध्ये एकमेकाबद्दल प्रेम जागृत करू इच्छित होते.

"उपासाचे ११ दिवस तर लोकांनी कसेबसे काढले. १२ व्या दिवशी डॉक्टर म्हणाले की आता जर गांधीजींनी उपास सोडला नाही तर त्यांच्या जिवाला धोका आहे. ही बातमी ऐकताच देशाबर जणू काही अंधार पसरला. गांधीजींच्या सर्व साथीदारांनी तसेच डॉक्टरांनी गांधीजींना उपास सोडण्याबद्दल खूप आग्रह केला. त्या दिवशी गांधीजींचा मोनवार होता. त्यामुळे त्यांनी एका चिट्टीवर लिहून कळविले की 'ईश्वरावर विश्वास ठेवा, प्रार्थनेची शक्ती मोठी आहे.' ती रात्र फारच भयानकपणे सरली. सर्व लोकांनी संपूर्ण रात्र जागून गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी ईश्वराची प्रार्थना केली."

हरी—"आई ! तर मग देवाने त्या लोकांची प्रार्थना ऐकली का?"

आई—"हो, त्याने आपल्या सर्वांची प्रार्थना ऐकली. दुसऱ्याच दिवशी सकाळी महात्माजींची तब्येत पूर्वीपेक्षा खूप चांगली आहे अशी बातमी देशभर पसरली. २१ दिवस पूर्ण झाल्यावर गांधीजीनी उपास सोडला. उपास सोडतेवेळी ते खूप आनंदी दिसत होते.

“त्या दिवशी गांधीजीचे सर्व साथीदार सकाळी चारला उठले. उठून प्रार्थना केली. दुपारी बारा वाजता गांधीजी उपास सोडणार होते. उपास सोडण्यापूर्वी सर्वात आधी कुराण वाचण्यात आले. कुराण वाचल्यावर एका ख्रिस्ती मित्राने एक गाणे म्हटले. त्या गाण्यानंतर गीतापाठ करण्यात आला आणि त्यानंतर गांधीजी संत्र्याचा रस प्याले व त्यांनी उपास सोडला.

“ह्या प्रसंगी पंडित मोतीलाल नेहरु, देशबन्धू चित्तरंजनदास, मौलाना आझाद, मौलाना शौकत अली, डॉ. अनसारी, मौलाना महंमद अली, हकीम अजमलखान तसेच स्वामी श्रद्धानंद वगैरे जे हिंदू-मुसलमान पुढारी हजर होते त्यांनी गांधीजींना वचन दिले की हिंदू-मुसलमान एकतेसाठी ते शक्य ते सर्व करतील. गांधीजींच्या ह्या उपासानंतर फार कालपर्यंत हिंदू-मुस्लिम एकता कायम राहिली.

“त्यानंतर गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाचे काम हाती घेतले आणि स्पृश्या—अस्पृश्यामधील भेदभाव दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न करण्यास सुरुवात केली. त्याकाली त्रावणकोरचे ब्राह्मण हरिजनांना मुख्य रस्त्यावरून जाऊ देत नव्हते. हे समजल्याबरोबर गांधीजी लगेच त्रावणकोरला गेले. तेथे त्यांनी आपले सत्याग्रहाचे जुने शस्त्र पुन्हा आजमावले आणि त्रावणकोरचे सगळे रस्ते हरिजनांसाठी मोकळे केले.

“ह्याच सुमारास गुजरातच्या बारडोली तालुक्यामध्ये शेतकरी व सरकार ह्यांच्यामध्ये लढा सुरू झाला. गांधीजींना ही गोष्ट कळली. सरकार शेतकऱ्यांवर जुलूम करीत आहेत असे समजताच त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल ह्यांना बारडोलीला पाठविले आणि त्यांना शेतकऱ्यांचे नेतृत्व करण्यास सांगितले. चातुर्याने व अथांग परिश्रमाने सरदारांनी सरकारवर मात केली. बारडोलीच्या लढ्यात शेतकऱ्यांचा विजय झाला.

“देशात अशांती चांगलीच वाढत चालली होती. सबंध देशात ‘महात्मा गांधीकी जय' असा जयघोष होत होता. हिंदुस्थानला संपूर्ण स्वतंत्रता मिळवून देण्यासाठी लोक तुरुंगात जायला तसेच स्वत:चे बलिदान करायला तयार झाले.

“१९३० साली काँग्रेसने तिरंगी झेंडा राष्ट्रध्वज म्हणून स्वीकारला. महात्मा गांधीनी तर १९२९ सालापासून तो राष्ट्रध्वज म्हणनू स्वीकारला होता.

“ह्या झेंड्यामध्ये वरचा केशरी रंगाचा पट्टा शौर्याचे प्रतीक आहे. मधला पांढरा पट्टा पवित्रतेचे आणि खालचा हिरवा पट्टा शांती व आनंदाचे प्रतीक आहे. मध्ये जो चरखा आहे तो परिश्रम व काबाडकष्टांची कदर करण्याचा उपदेश देत आहे. हा झेंडा कोणा एका धर्माचा किंवा जातीचा नाही पण सर्व जनतेचा आहे. त्याचा आदर करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.



दांडीकूच – १९३०

“हिंदुस्थानातील लोक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आतुर होते. पण इंग्रज त्यांची मागणी धुडकावून लावत होते. म्हणून गांधीजी कायदेभंग करून सरकारविरुद्ध सत्याग्रह करू इच्छित होते. ते अशा कायद्याचा भंग करू इच्छित होते की जो तोडल्याने सर्वसामान्य जनतेला फायदा झाला असता. त्यांनी मिठाच्या कायद्याचा भंग करण्याचे ठरविले. मीठ हे गरीब तसेच श्रीमंत सर्वांना आवश्यक आहे. समुद्राच्या पाण्यामधून आणि विशिष्ट ठिकाणच्या जमिनीतून वाटेल त्याला मीठ बनविणे शक्य असे. पण सरकारनी असा कायदा केला होता की सरकारशिवाय कोणालाही मीठ बनविण्याची परवानगी नव्हती. अशाने सरकार मीठाच्या द्वारे हवा तेवढा कर वसूल करू शकत होते. गांधीजींच्या मते मिठावरील कराचा बोजा श्रीमंतापेक्षा गरिबांवर जास्त

पडत होता. म्हणून त्यांनी मिठाचा कायदा मोडण्यासाठी तयारी करण्यास सुरवात केली. आणि गुजरातच्या दांडी ह्या गावी जाऊन मीठ बनविण्याचे ठरविले. दांडीला जाण्यापूर्वी त्यांनी उपास केला आणि ७९ साथीदारांबरोबर साबरमती येथील आश्रमातून दांडीला जाण्यासाठी कूच केले. सर्वांपुढे गांधीजी आणि त्यांच्यामागे त्यांचे साथीदार तीन तीनच्या ओळीत निघाले. प्रत्येक सत्याग्रह्याने खांद्यावर एक काठी घेतली होती व तिच्या टोकाला एक लहानशी वळकटी लटकत होती. गांधीजी जेथनू जेथून जात होते तेथे तेथे लोक त्यांच्या दर्शनासाठी येत. पाणी शिंपडून रस्ते तयार ठेवत. फुलानारळांनी सर्वजण त्यांचे स्वागत करीत. रस्त्यात ते थांबत, भाषणे करीत आणि उपदेश देऊन पुढे जात. ह्या प्रमाणे चालता चालता १२ मार्चला निघालेले गांधीजी ५ एप्रिलला दांडीला पोहोचले. दांडी हे गुजरातच्या समुद्रकिनारी आलेले एक गाव आहे. अहमदाबादहून ते २०० मैल दूर आहे.

“महात्माजींनी कायदेभंग करून मीठ तयार केल्याबरोबर जणू काही झोपलेला सारा देश जागा झाला. लोकांनी ठिकठिकाणी मीठ तयार केले आणि सविनय कायदेभंग केला. सरकार देखील तितक्याच क्रूरपणे त्यांच्यावर तुटून पडले.

“४ मे रोजी रात्री हत्यारबंद पोलिसांनी गांधीजींच्या झोपडीला घेरले. गांधीजी आणि त्यांचे साथीदार शांतपणे झोपले होते. तेवढ्यात एका इंग्रज अधिकाऱ्यांने गाधींजींच्यावर बेटरीचा प्रकाश टाकून विचारले, “तुम्ही मोहनदास करमचंद गांधी आहात?' गांधीजी म्हणाले, “तुम्ही मला घेऊन जाण्यासाठी आला आहात? थोडा वेळ बसा. मी तोंड धुऊन तुमच्या बरोवर येतो.' गांधीजींनी दात घासले आणि तोंड धुतले. पोलीस अधिकारी त्यांची वळकटी घेऊन उभा राहिला. तोंड धुऊन गांधीजींनी प्रार्थना करण्यासाठी थोडा वेळ थांबण्याची परवानगी मागितली. आपल्या साथीदारांबरोबर त्यांनी प्रार्थना केली आणि भजन म्हटले. सर्वांनी एकामागून एक महात्माजींना नमस्कार केला. एका शिपायाने खादीच्या दोन लहान पिशव्या उचलून घेतल्या. ह्या पिशव्यांमधे गांधीजींनी आवश्यक वस्तु घेतल्या होत्या. गांधीजी सर्वांत पुढे निघाले आणि मोटारीत बसले.

त्यांच्या मागून पोलीस पण मोटारीत बसले. अशा प्रकारे रात्रीच्या वेळ पोलीस चोराप्रमाणे आले व गांधीजींना पकडून घेऊन गेले."

हरी—"पण त्या सगळ्यांनी आरडाओरड का केली नाही? आरडाओरड केली असती तर लोक धावत आले असते, आणि त्यांना पोलिसांच्या तावडीतून सोडविले नसते का?"

आई—"पोलीस किंवा सरकारचा विरोध करण्यात हिंसा किंवा जबरदस्ती करावी लागली असती आणि गांधीजींची तसे करण्याची कधीच इच्छा नव्हती हे तर तुला माहीत आहे. तरी तू असा प्रश्न विचारतोस?"

हरी—"होय आई ! ही गोष्ट तर माझ्या लक्षातच राहिली नाही. ठीक, पण त्यानंतर काय झाले ते तर सांग."

# १२

**आई—"आठ** महिने गांधीजी तुरुंगात होते. ते तुरुंगातून सुटले त्यावेळी देशाची स्थिती बदलून गेली होती. देशावर गांधीजींचा एवढा काही प्रभाव होता की आपल्या ताकतीची घमेंड असणाऱ्या इंग्रज सरकारला गांधीजींच्या बरोबर तडजोड करावी लागली.

"तडजोड करण्यासाठी इंग्लंडमध्ये गोलमेज परिषद झाली. काँग्रेसने गांधीजींना आपला प्रतिनिधी म्हणून ह्या परिषदेत पाठविले. निघताना गांधीजींनी देशातील लोकांना वचन दिले की तुम्ही माझ्यावर जो विश्वास ठेवला आहे तो मी फोल होऊ देणार नाही, एवढी मी तुम्हाला खात्री देतो.

"१२ सप्टेंबर रोजी गांधीजी लंडनला पोहोचले. तेथील वर्तमानपत्रात त्यांचे मोठमोठे फोटो प्रसिद्ध झाले. एका वर्तमानपत्रवाल्याने एक काल्पनिक चित्र काढून त्यात महात्माजी प्रिन्स ऑफ वेल्सच्या पाया पडत आहेत असे दाखविले. हे चित्र पाहून गांधीजी हसून म्हणाले, "ज्यांना आपण* देशातील अत्यन्त गरीब भंग्यांच्याही पाया पडायला मी तयार आहे. अशा अस्पृश्यांच्यापुढे मान वाकविण्यात काही कमीपणा नाही; पण इंग्लंडच्या राजकुमाराच्याच काय पण राजाच्या देखील पाया पडायला मी तयार नाही.'

"गोलमेज परिषदेत भाषण करताना गांधीजींनी म्हटले की, 'हिंदुस्थानमध्ये कोणत्याही प्रकारे इंग्रजांना कमीपणा येईल असे करण्याची माझी मुळीच इच्छा नाही. हां, येवढे मात्र खरे की इंग्रजांनी हिंदुस्थानला आपल्या बरोबरीचा मानावे आणि त्याच प्रमाणे आपल्या बरोबरीच्या देशांशी ते ज्या प्रकारची वागणूक ठेवतात त्या प्रकारची वागणूक त्यांनी हिंदुस्थान बरोबर पण ठेवावी. '

"परिषद पूर्ण झाल्यावर राजाने आणि राणीने सर्व—सभासदांना आपल्या राजमहालात भेटीला बोलावले. इतर सगळे सभासद एका पेक्षा एक उत्तम सूट घालून तेथे गेले. पण गांधीजी

मात्र एक साधे कांबळे पांघरून खादीचा पंचा नेसून आणि पायात चप्पल घालून राजाच्या भव्य महालात गेले.”

हरी—“आई, राजाच्या महालात जायच्या वेळी देखील त्यांनी चांगले कपडे घातले नाहीत असे कसे?"

आई—“बाळ, त्याचे असे की आपल्या सारख्या गरीब देशाच्या प्रतिनिधीला गरीबासारखेच कपडे शोभणार. गांधीजी राजवाड्यात गेले तेव्हा राजा आणि राणीने त्यांच्याबरोबर खूप वेळ गप्पा मारल्या.”

हरी—“खरेच !”

आई—“इंग्लंडमध्ये गांधीजी 'मिस लिस्टर' नावाच्या एका गरीब इंग्रज बाईकडे पाहुणे म्हणून राहिले. त्या बाईच्या घरी ते जसे हिंदुस्थानात राहत होते तसेच राहिले. सकाळ-संध्याकाळ ते प्रार्थना करीत व संध्याकाळी फिरायला जात. त्यांच्या साधेपणाचा आणि प्रेमाचा इंग्रजांच्या गरीब जनतेवर फार प्रभाव पडला, आणि तो प्रभाव आजपर्यंत कायम आहे.

“कोणीही माणूस नव्या शहरात अथवा नव्या देशात जातो तेव्हा तेथील प्रसिद्ध लोकांना भेटायचे चुकत नाही. गांधीजीदेखील श्रीयुत चर्चिल ह्यांना भेटू इच्छित होते. पण श्रीयुत चर्चिल ह्यांनी गांधीजींना भेटण्यास नकार दिला व म्हटले की, 'हा नंगा फकीर जोपर्यंत व्यवस्थित कपडे घालून येणार नाही तोपर्यंत मी त्याला भेटू इच्छित नाही.'

“श्रीयुत चर्चिलच्या अशा उद्धट उत्तराने गांधीजींवर तर काही परिणाम झाला नाही पण भारतीयांची मने खूपच दु:खावली.

“हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांच्यामध्ये कुठल्याही प्रकारची तडजोड न होता गांधीजी मायदेशी परतले. वाटेत ते इटलीत थांबले. तेथील हुकुमशहा मुसोलिनी ह्याला भेटले. रोममध्ये त्यांनी पोपचा राजवाडा 'व्हेटिकन' पण पाहिला. डिसेम्बरच्या शेवटी ते मुंबईला येऊन पोहोचले. त्या सुमारात सर्व देशात धरपकड चालू होती. पंडित जवाहरलाल नेहरु, खान अब्दूल गफ्फारखान

आणि सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या सारख्या लोकप्रिय नेत्यांना पकडून सरकारने तुरुंगात डांबले होते. कमीत कभी ९०,००० माणसांना तुरुंगात ठेवण्यात आले होते. इंग्रज सरकार कोणत्याही प्रकारे कॉंग्रेसचा नाश करायचा प्रयत्न करीत होते. पण लोकांवर त्याचा उलट परिणाम होत असे व स्वराज्य मिळविण्यासाठी त्यांची तळमळ अधिकच तीव्र होई. सरकारचे अत्याचार पण हळूहळू वाढत गेले आणि त्यांनी महात्माजींना अटक करून त्यांना पुन्हा तुरुंगात पाठविले. गांधीजींना तुरुंगात पाठवून सर्व देशाचे धैर्य मोडून टाकणे आपणास शक्य होईल असे इंग्रज सरकारला वाटत होते, पण गांधीजीनी पेटवलेली ज्योत एवढ्या सहजपणे विझणार थोडीच? गांधीजी तुरुंगात गेल्यावर हिंदुस्थानच्या अडचणी वाढत गेल्य. देशाला भोगाव्या लागणाऱ्य दुखांची गोष्ट ऐकून गांधीजी बेचैन होत होते. शेवटी सरकारचा हा जुलूम थांबविण्यासाठी त्यांनी तुरुंगात आमरण उपोषण सुरू केले. उपास सुरू करताच सरकारने त्यांना सोडून दिले. तुरुंगातून बाहेर आल्यावर लगेच त्यांनी सत्याग्रहाचा लढा थांबविला व अस्पृश्योद्धाराचे काम हाती घेतले."

हरी—"आई ! अस्पृश्यांना सर्व जण हरिजन का म्हणतात?"

आई—"बाळ लोक ज्यांना अस्पृश्य म्हणून ओळखतात ते खरे म्हणजे हरीच्या अर्थात ईश्वराच्या भक्तांची सर्वात जास्त सेवा करतात. असे असल्यामुळे ते ईश्वराला सर्वात जास्त प्रिय बाटत असणार. असा विचार करून गांधीजींनी त्यांना 'हरिजन' म्हणजे 'देवाचे लाडके' असे म्हणायला सुरुवात केली. अशा रीतीने अस्पृश्यांचे 'हरिजन' असे नाव पडले."

---

* शतकानुशतके पायाखाली तुडवले आहे अशा आपल्या ।

# १३

**"लहानपणापासून** गांधीजी स्पृशास्पृश्यतेचा भेदभाव वाईट मानत होते ते तुला माहीत आहेच. देशातील ही वाईट रुढी पाहून ते मनातल्या मनात संतापत. त्यांचे म्हणणे असे होते की सगळी माणसे सारखीच आहेत. शिवाय कोठल्याही माणसाला आपण दुसऱ्यापेक्षा उच्च आहोत असे मानण्याचा मुळीच अधिकार नाही. देवाच्या दरबारात माणसाच्या कर्मांचे मूल्य करून त्याला उच्च किंवा नीच ठरविले जाते. जातीपातीचे भेद माणसाच्या कल्पनेने निर्माण केलेले असल्यामुळे ते एक प्रकारचे ढोंग आहे.

"जी गोष्ट आपल्या देशवासीयाना समजावायची आहे तिचा केवळ उपदेश देऊन ते गप बसत नसत. ते ती आचरणात पण आणून दाखवायचे. त्यांनी वर्ध्यात एक आश्रम सुरू केला. पुढे हा आश्रम 'सेवाग्राम आश्रम' ह्या नावाने प्रसिध्द झाला. ह्या आश्रमात जातीपातीचा किंवा धर्माचा कोठल्याही प्रकारचा भेदभाव नव्हता. कोणीही मनुष्य त्या आश्रमात दाखल होऊ शकायचा. दळणे, कपडे धुणे स्वयंपाक करणे, केर काढणे, संडास साफ करणे, आणि अशा प्रकारची सगळीच कामे प्रत्येकाला स्वत: करावी लागत. गांधीजी आणि कस्तुरबा पण इतर आश्रमवासीयांप्रमाणे ही कामे स्वतःच करीत असत. आश्रमात एकच स्वयंपाकधर होते. आणि सर्व आश्रमवासीयांचा स्वयंपाक तेथेच करण्यात येई. सर्वजण एकत्र जेवायला बसत. जेवायच्या आधी सर्वजण प्रार्थना करीत व 'ॐ शांति: शांति:' चा मंत्र पूर्ण करुनच जेवायला बसत.

"आश्रमाचा कोपरा न कोपरा तपासल्याशिवाय गांधीजींना चैन पडत नसे. कोणत्याही ठिकाणी कचरा किंवा घाण दिसली की ते स्वत:च ती साफ करीत असत. आश्रमात कोणी आजारी असले तर ते त्याला पहायला नियमित जात. ते त्याच्याशी गप्पाटप्पा करीत आणि त्याचे मनोरंजन करीत. आजारी माणसाचे औषधपाणी आणि त्यांची शुश्रूषा देखील ते चांगल्या तऱ्हेने करीत असत.

"एकदा आश्रमात एका मद्रासी मुलाला मुरडा झाला. तब्येत थोडी सुधरताच त्याला मजेदार मद्रासी कॉफी आठवली. इतर आश्रमवासीयांप्रमाणे साध्या व उकडलेल्या जेवणाची त्याला सवय झाली होती. तरी देखील मद्रासी कॉफी त्याला रोज आठवायची. पण आश्रमात चहा-कॉफी प्यायची व पान खाण्याची बंदी होती. म्हणून त्याला कॉफी पिणे शक्य नव्हते. कॉफी प्यायला मिळाली तर किती छान होईल अशा विचारात तो होता. तेवढ्यात महात्माजींच्या खडावांचा आवाज त्याच्या कानी पडला. थोड्याच वेळात त्याने गांधीजींचा हसरा चेहेरा समोर पाहिला. गांधीजी त्याच्या खाटेजवळ आले व म्हणाले, 'आज तर तुझी तब्येत पूर्वीपेक्षा चांगली दिसत आहे. आता तुला भूक पण चांगली लागत असेल.' गांधीजींना माहीत होते को दक्षिणेकडच्या लोकांना डोसा खूप आवडतो. तेव्हा ते गंमतीने म्हणाले, "डोसा खायची तर इच्छा होत नाहीना?'

हरी—"आई, डोसा म्हणजे काय?"

आई—"आपण धिरडी करतो ना तसाच हा एक मद्रासी प्रकार आहे. त्याला डोसा म्हणतात. गांधीजींच्या तोंडून खाण्याची गोष्ट निघताच तो मुलगा रंगात आला. थोडेसे घाबरत घाबरत म्हणाला, 'बापू मी कॉफी पिऊ?' 'अरे लबाडा' गांधीजी हसून म्हणाले, 'तुला कॉफीच प्यायची आहे ना? जरूर पी. कॉफी प्यालाने तुला जरा बरे पण वाटेल. पण कॉफी बरोबर काय घेशील? डोसे तर बनविणे शक्य नाही. कॉफीच्या बरोबर गरम गरम टोस्ट चांगले लागतील. ते खा. आताच तुझ्यासाठी कॉफी आणि टोस्ट पाठवितो.'

"असे म्हणून गांधीजी निघून गेले. मुलाला वाटले की आश्रमात तर चहा आणि कॉफी प्यायची सूट नाही. गांधीजींनी चुकून तर नाही ना हो म्हटले? आश्रमात आणि ते देखील गांधीजींच्या हातची कॉफी प्यायचे त्याच्या नशीबात लिहिले असेल ही गोष्टच तो मानू शकत नव्हता.

“थोड्याच वेळात गाधीजींच्या खडावाचा आवाज पुन्हा ऐकू आला. त्या मुलाचे हृदय धडधडू लागले. त्याला वाटले की आता गांधीजी येथील आणि म्हणतील 'आश्रमात कॉफी पिण्याची मनाई आहे. मी तुला चुकून हो म्हणालो होतो.' पण त्याने पाहिले की गांधीजी खादीच्या रुमालाने झाकलेले ताट घेऊन त्याच्या खोलीकडे येत होते. त्याच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही. गांधीजींनी त्या मुलाला ते ताट देता देता म्हटले, 'घे हा टोस्ट आणि ही कॉफी. मी स्वत: करुन घेऊन आलो आहे. ही कॉफी पिऊन तर तुझ्यासारख्या मद्राशाला पण वाटेल की नाही, बापूंना चांगली कॉफी पण करता येते.'

‘पण... पण.' मुलाने अडखळत अडखळत म्हटले, 'तुम्ही कोणा दुसऱ्याला सांगितले असते तर? माझ्यामुळे तुम्हाला किती त्रास झाला?'

“त्याला गद्गदित झालेला पाहून गांधीजींना हसू आले ते म्हणाले 'गरम कॉफीची मजा उगीचच कशाला बिघडवतोस? कस्तुरबा झोपल्या होत्या तेव्हा त्यांना उठवणे मला बरे वाटले नाही. तू आता कॉफी पिऊन घे, मी जातो. कुणीतरी येवून भांडी घेऊन जाईल' एवढे बोलून गांधीजी निघून गेले. कॉफी खूप छान झाली होती. मुलगा अगदी चवीने कॉफी प्याला. त्याच्या दृष्टीने ती कॉफी नव्हती पण गांधीजींच्या हातचे अमृत होते.”

हरी—“आई, आश्रमात तर कोणी चहा किंवा कॉफी पीत नसे. मग गांधीजींनी एवढ्याशा वेळात कॉफी कोठून आणली?”

आई—“राजगोपालाचारी व मिस्टर ॲण्ड्रूज गांधीजींना भेटण्यास पुष्कळदा येत असत. त्यांच्यासाठी कस्तुरबा या वस्तू ठेवीत असत. त्यामुळेच एवढ्या लवकर कॉफी मिळू शकली. समजलास?



गांधीजींची झोपडी – सेवाग्राम

"सेवाग्राममध्ये गांधीजींकडे निरनिराळया प्रकारचे लोक येत असत. कोणी आपल्या आजारी मुलासाठी औषधपाणी करण्याकरता तर कुणी आपल्या जमिनीच्या भांडणाचा निकाल लावण्याकरता त्यांच्याकडे येत असत. केव्हा केव्हा एकादे जोडपे आपल्या भांडणाचा निकाल लावण्यासाठी पण गांधीजींकडे येत असे. एक दिवस एक गृहस्थ गांधीजींकडे आले. ते दिसायला वेडपटासारखे दिसत होते. पण ते खूप विद्वान होते. आधी ते कोठल्यातरी कॉलेजमध्ये प्रोफेसर होते. त्यानंतर ते किती तरी वेळा तुरुंगाची हवा खाऊन आले होते आणि नंतर संन्यासी झाले होते. अनेक आठवडे त्यांनी उपास केला आणि मग एके दिवसी संसाराचा मायामोह सोडून जंगलाचा रस्ता धरला. अनेक वर्षेपर्यंत ते कपड्याशिवाय भटकले. कित्येक दिवस त्यांनी मौन पाळले. मौनाच्या वेळी चुकूनसुद्धा बोलले जाऊ नये म्हणून त्यांनी ओठ तांब्याच्या तारेने शिवून टाकले आणि मात्र पाणी घालून पातळ केलेली कणीक व कडू लिंबाचा काढा पिऊन ते पोट भरू लागले.

"सुरुवाती सुरुवातीला कोणत्याही प्रकारचे काम करण्यास ते घाबरत असत, पण पुढे पुढे ते सतत सतरा तास काम करू लागले. आठ दहा तास ते कातायचे आणि सातेक तास आश्रमातील लोकांना शिकवायचे. जो माणूस एके काळी तोंड शिवून फिरायचा त्याच्या थट्टामस्करीने व सात मजली हसण्याने आश्रम गाजायला लागला. आता ते एक लहान पंचा पण नेसायचे. या एका पंचाशिवाय दुसरे कोठलेही सामान ते आपल्यापाशी ठेवत नसत. जेथे सापाची

किंवा विंचवाची खूप भीती असायची त्या ठिकाणीसुद्धा ते बेधडक जात असत. कधी कधी त्यांना पुन्हा लहर येत असे व ते घाबरलेल्या चेहेऱ्याने महात्माजींच्या जवळ येवून विहिरीत खाली डोके वर पाय करून लटकत रहायची परवानगी मागत, पण गांधीजी तशी परवानगी कशी देतील? देवाच्या कृपेने ते गांधीजींचे वाक्य म्हणजे वेदवाक्य मानीत होते. आणि त्यामुळे ते आपल्या मनाप्रमाणे वागू शकत नव्हते.

त्या काळी गांधीजी आश्रमात राहून अस्पृश्यता, त्याच प्रमाणे जातीपातींचे भेदभाव व अज्ञान दूरकरण्याचे काम करीत होते. त्यांनी चरखासंघ, शिक्षण संघ आणि गो-सेवा संघ ह्यांची स्थापना केली. त्यांची अशी इच्छा होती की हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांनी आपल्या फुरसतीच्या वेळात हात जोडून बसून राहू नये त्यांनी सूत कातावे, कापड विणावे किंवा दुसरे कोणतेही हस्त-उद्योगाचे काम शिकावे. ही कामे करता करता त्यांनी लिहिणे, वाचण पण शिकावे ह्या सर्व गोष्टींच्या प्रचारा मार्फत ते खेडेगावातील शेतकऱ्यांना व सगळ्या लोकांना स्वतंत्र्यासाठी तयार करीत होते. त्यांना केवळ राजकीय स्वराज्यच नको होते तर ते गरीबी, रोगराई व अज्ञानाच्या बंधनातून देखील शेतकऱ्यांना मुक्त करू पाहात होते. शिवाय ह्या सगळ्या गोष्टी. एकमेकांशी अशा रीतीने जोडलेल्या होत्या को त्यांच्या मधील एक जरी नसेल तरी बाकीच्या सर्वांची काहीही किंमत राहणार नाही."

एवढे सांगून हरीच्या आईने हरीला विचारले, “बाळ तुला झोप तर येत नाही ना? थकला असशील तर सांग. आता थोडीशीच गोष्ट बाकी आहे. तुझी ऐकायची इच्छा असेल तर गोष्ट पूर्ण करते. नाहीतर बाकीची उद्या सांगीन.”

हरी—“नाही आई ! मला झोप येत नाही. मला गोष्ट ऐकण्यात खूपच मजा वाटते आहे. मी खूप लक्ष देऊन ऐकतो आहे. संपूर्ण गोष्ट ऐकल्याशिवाय मला चैन पडणार नाही. तेव्हा तू गोष्ट पुरी कर.”

## १४

**"हिंदुस्थानातील** लोकांच्या मनावर गांधीजींचा प्रभाव इंग्रज सरकारपेक्षा किती तरी पटीने जास्त होता. कित्येक प्रांतात तर त्यांच्या काँग्रेसी साथीदारांनी मंत्रीपदे शोभविली होती. देशाची अशी बदललेली परिस्थिती इंग्रज सरकारच्या डोळ्यात खुपत होती. लोकांचा वाढत असलेला उत्याह त्यांना बेचैन करीत होता.

"आपल्या पुढाऱ्यांनी राज्याची सूत्रे हातात घेतली. त्यानंतर थोड्याच दिवसांनी इंग्लंड व जर्मनी ह्यांच्यामधे युद्ध भडकले ते जगातील दुसरे मोठे युद्ध होते. इंग्रजांनी आपल्या पुढाऱ्याचा संमतीशिवायच आपल्या देशातील माल आणि शिपाई जर्मनांच्या विरुद्ध युद्धामधे पाठवायला सुरुवात केली. त्यामुळे लोकांना फार वाईट वाटले. काँग्रेसी नेत्यांनी ताबडतोब गांधीजींच्या सल्ल्याने मंत्रीपदाचे राजीनामे दिले. गांधीजींचे म्हणणे होते की अशा महत्वाच्या बाबतीत देखील आपल्या पुढाऱ्यांना काहीच विचारले जाऊ नये तर मग मंत्रीपदवर राहण्यात काय अर्थ आहे?

"गांधीजींना आश्रमात बसल्याबसल्या सर्व जगाच्या बातम्या मिळत असत. दोन देशामध्ये युद्ध पेटल्यावर किती नुकसान होईल हे त्यांना माहीत होते. त्यानी जर्मनीचा हुकुमशहा हिटलर ह्याला एक पत्र लिहून कळविले की जगात मी कोणालाच माझा शत्रू मानीत नाही. पण आपण दोघेही एकाच शत्रू विरुद्ध म्हणजे इंग्रजांच्या विरुद्ध लढत आहोत. जर तुम्ही देखील माझ्याप्रमाणे अहिंसेच्या शस्त्राने इंग्रजांच्या विरुद्ध लढाल तर किती चांगले होईल. कारण हिंसक लढाईने जगाचा नाश झाल्याशिवाय राहणार नाही. अहिंसेच्या शस्त्राविषयी तुम्हाला काही जाणून घ्यायची इच्छा असेल तर तुमच्या सैन्यातील एक शिपाई माझ्या आश्रमात राहून गेला आहे. त्याच्यापासून तुम्हाला माहिती मिळू शकेल. ह्यावेळी तुम्हीच हे महायुद्ध थांबवू शकाल.

"गांधीजींची इच्छा होती की हे पत्र व्हॉईसरॉयच्या मार्फत पाठवावे. पण व्हॉईसरॉयने तसे करण्यास नकार दिला. व्हॉईसरॉयने हे पत्र हिटलरपर्यंत पोहोचू दिले असते आणि हिटलरने

महात्माजींचे म्हणणे मानले असते तर हे जग मोठ्या विनाशातून वाचले असते. पण इंग्रज व हिटलर दोघांना आपल्या ताकतीचा गर्व होता. ते गांधीजींचे म्हणणे कशाला ऐकतात?

"इंग्रजांनी आपल्याला शांततेने स्वातंत्र्य द्यावे ह्यासाठी गांधीजींनी त्याकाळी खूप प्रयत्न केले. पण दर वेळेस हे प्रयत्न फुकट गेले. लढाई करून व रक्तपात करून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी गांधीजी तयार नव्हते. त्यांनी जर ठरविले असते तर इंग्रज सरकारच्या विरुद्ध लढण्यासाठी सर्व देशाला ते लढाईच्या मैदानात आणू शकत होते. पण अहिंसेच्या त्या पुजाऱ्याला हे पसंत नव्हते. म्हणून त्यांनी सरकार विरुद्ध लढा चालू ठेवण्यासाठी एक आगळी पद्धत शोधून काढली. सामुदायिक सत्याग्रह बंध करून प्रत्येक जणांनी आळीपाळीने वैयक्तिक सत्याग्रह करावा असे त्यांनी ठरविले. ज्यांना अहिंसा म्हणजे काय ते बरोबर माहीत होते व जे तिचे आचरण करीत होते अशा लोकांना वैयक्तिक सत्याग्रहासाठी पाठविण्यात येत असे. गांधीजींनी पहिला वैयक्तिक सत्याग्रही म्हणून विनोबा भावे ह्यांची पसंती केली. सरकारने त्यांना तर पकडलेच, पण ज्यांनी सत्याग्रहात सक्रिय भाग घेतला नव्हता अशा शेकडो देशभक्तांना पण त्यांच्या बरोबरच त्यांच्या घरातून पकडले. तुरुंगात डांबले. पंडित जवाहरलाल नेहरुंना देखील चार वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. पण भारतवासीयांचा उत्साह व तळमळ पाहून इंग्रज सरकार घाबरून गेले आणि थोड्याच दिवसात त्यांनी आपल्या सर्व पुढऱ्यांना व देशभक्तांना सोडून दिले.

"युरोपची लढाई खुप जोरात चालली होती. तेवढ्यात अशी बातमी आली की जपानने अमेरिकेवर हल्ला केला आहे आणि शिवाय रंगून पण काबीज केले आहे. रंगूनवर जपानचा झेंडा फडकू लागला आणि लोक तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी बोलायला लागले. कोणी म्हणत होते की अमेरिका व जपान ह्यांच्या लढाईत आपण किडा—मुंगीसारखे चिरडले जाऊ. तर कोणी असे इच्छित होते की जपान्यांनी ब्रह्मदेशात पुढे येवून तेथून इंग्रजांना हाकलून काढल्यास बरे. अर्थात् लोक पुन्हा एकदा स्वतंत्र होण्यासाठी पुन्हा अधीर झाले होते.

"लोकांना स्वराज्य मिळविण्यासाठी इतके अधीर झालेले पाहून इंग्रजांनी लंडनहून मिस्टर क्रिप्स ह्यांना दिल्ली येथे पाठविले. ते हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांच्यामधे तडजोड करण्यासाठी

आलेले असल्यामुळे लोकांना अंधारात आशेचा एक लहानसा किरण दिसला. लोकांना वाटले की आता बहुतेक स्वराज्य मिळेल. परंतु त्यांची आशा पूर्ण झाली नाही. त्यांनी ज्या अटी घातल्या त्या आपल्या नेत्यांना पसंत नव्हत्या आणि इंग्रज आपल्या नेत्यांची मागणी मान्य करायला तयार नव्हते. म्हणून क्रिप्स जसे आले तसे रिकाम्या हाती परत गेले. गांधीजी व इतर पुढाऱ्यांनी नक्की केले की जोपर्यंत आपला देश स्वतंत्र होणार नाही तोपर्यंत महायुद्धात इंग्रजांना मदत करायची नाही.

"गांधीजींनी पाहिले की महायुद्धाच्या ज्वाळा आणि जपानच्या युद्धाची झळ हिंदुस्थानचा नाश करीत आहे. अगतिक भारतीयांची इच्छा नसताना देखील त्यांचा पैसा आणि तरुण ह्यांना युद्धाच्या कामी वापरण्यात येत आहे. हे पाहून गांधीजींना दुःख झाले. त्यांनी सर्व नेत्यांना एकत्र केले व म्हटले की जोपर्यंत आपण इंग्रजांचे गुलाम आहात तोपर्यंत ते ह्याच प्रमाणे आपले रक्त शोषण करतील. तेव्हा चला आपण सगळे एकत्र होऊन इंग्रजांना आपल्या देशातून हाकलून लावूया. पण त्यांच्या विरुद्ध हिंसक लढाई करून त्यांना काढण्यात काही अर्थ नाही. आपण सगळ्यांनी एक होवून एका स्वरात इंग्रजांना 'हिंद सोडा' असे सांगितले पाहिजे. गांधीजींच्या तोंडातून 'हिंद सोडा' हे शब्द निघताच चाळीस कोटी लोकांनी ते उचलून धरले. 'इंग्रजांनो, हिंद सोडा' ह्या आरोळयांनी सबंध देश गर्जून उठला इंग्रजांना त्यांच्या घराबाहेर, रस्त्यावर, ऑफिसमधे, टेबलावर, मोटारीवर, प्रत्येक ठिकाणी 'हिंद सोडा' असेच दिसू लागले ते समजून चुकले की आता खरोखरच हिंदुस्थान सोडून जाण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

"लगेच गांधीजींनी व्हॉईसरॉयला—एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी कळविले की इंग्रज हिंदुस्थानला स्वातंत्र्य देतील तर भारतवासी त्यांना युद्धात मदत करतील. जर त्यांनी ह्यावेळीसुद्धा हिंदुस्थानला स्वातंत्र्य दिले नाही तर भारतवासी प्राण पणाला लावून स्वातंत्र्याचा लढा लढतील. हा लढा खूप भयंकर पण तो अहिंसक रीतीने लढला जाईल."

हरी—"आई ! व्हॉईसरॉय ह्यांनी गांधीजींच्या पत्राचे उत्तर दिले की नाही?"

आई—“ह्या पत्राचे व्हॉईसरॉय काय उत्तर देणार? त्यांनी तर काहीही विचार न करता आपल्या सर्व मोठ्या मोठ्या पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना पकडून तुरुंगात डांबून टाकले. गांधीजींना आणि कस्तूरबांना ते पुण्याला घेऊन गेले. तेथे त्यांना आगाखान महालात नजरकैदेत ठेवले. सरोजीनी नायडू, सुशीला नयर व महादेवभाई वगैरे साथीदारांना पण त्यांच्या बरोबर नजरकैदेत ठेवण्यात आले."

# १५

**हरी—"आई !** आगाखान महालामध्ये तर गांधीजी खूप मजेत राहत असतील नाही?"

आई—बाळ ! ते गरिबांचे कैवारी होते. दु:खी लोकांच्या मनाला ते आशेचे किरण वाटायचे. हिंदुस्थानच्या नौकेचे ते वृद्ध कर्णधार होते. असे गांधीजी आपल्या सर्वांपासून एकटे पडल्यावर आनंदात कसे राहू शकतील? त्या थाटामाटाच्या राजमहालात देखील त्यांना कोठून चैन पडणार? तेथील उंचउंच भिंती त्यांना खायला येत होत्या. गरिबांपासून दूर पडलेले गांधीजी जगातले कुठलेही सुख भोगू शकत नव्हते.



आगाखान पॅलेस – पुणे

"आगाखान महालात देखील ते अगदी साधेपणाने राहायचे. ते पहाटे उठत. उठून प्राथना करत आणि प्रार्थनेनंतर फळांचा थोडासा रस पिऊन आपल्या कामात गुंतुन जात. नंतर सर्व साथीदारांच्या बरोबर बसून जेवत असत. ज्यांना भारताची कोकिळ म्हणत त्या सरोजीनी नायडू नवे नवे चुटके व मजेदार गोष्टी सांगून गांधीजींना हसवीत असत. संध्याकाळी पुन्हा प्रार्थना होत असे. आणि प्रार्थनेनंतर परत सगळे आपापल्या कामात गुंतून जात असत. सबंध दिवसभर काम करायचे असल्यामुळे रात्री सगळे लौकर झोपत असत.

"महात्माजींना नजरकैद केल्यानंतर थोड्याच दिवसात त्यांचे लाडके महादेवभाई देसाई हृदय बंद पडल्यामुळे अचानक वारले. ते गांधीजींचे जुने साथीदार होते. दोघेही ३० वर्षे बरोबर

राहिले. गांधीजी त्यांच्यावर स्वत:च्या मुलासारखे प्रेम करीत व महादेवभाईनी पण आपले जीवन गांधीजींना व देशाला समर्पित केले होते. दोघेही एकमेकांच्या सुखदु:खाचे साथीदार होते. गांधीजी त्यांना आपल्या मनातील सर्व गोष्टी सांगत. आणि ते देखील गांधीजींना नेहमी योग्य सल्ला देत.

"महादेवभाईंच्या मृत देहाला गांधीजींनी आपल्या हाताने आंघोळ घातली. ताटी पण स्वत:च तयार केली. आणि महादेवभाईंच्या वडिलांप्रमाणे शेवटचे संस्कार पण त्यांनीच केले. आगाखान महालाच्या एका कोपऱ्यात चिता पेटविली व तेथेच महादेवभाईची समाधी पण बांधण्यात आली. गांधीजी जोपर्यत आगाखान महालात राहिले तोपर्यंत रोज त्या समाधीवर फुले वाहत असत.

"गांधीजी नजरकैद झाल्यामुळे व देशातील लोकांना शांत ठेवू शकेल असा कुणीही नेता बाहेर न राहिल्यामुळे आवेशात येऊन सगळेजण ज्याला जसे सुचले तसे सरकारच्या विरुद्ध लढा देत राहिले. आवेशात आल्यामुळे काही जण तर गांधीजींनी दिलेला अहिंसेचा उपदेश पण विसरून गेले. त्यांनी लपून छपून इंग्रज सरकारच्या विरुद्ध हिंसक लढा देण्यासाठी लोकांना प्रेरित केले. सरकारनेदेखील लोकांना दाबून टाकण्यासाठी गोळया झाडल्या. गावेच्या गावे जाळून बेचिराख केली. हजारो स्त्रीपुरुष आणि मुले ठार झाली आणि हजारो लोकांना तुरुंगात डांबून टाकण्यात आले. ह्या देशाची निरंकुश सेना योग्य मार्गावरून विचलित होऊन चुकीच्या रस्त्याला लागली.

"आपल्या गैरहजेरीत स्वातंत्र्याचा लढा भयानक स्वरूप धारण करील अशी गांधीजींना कल्पना देखील नव्हती. पुढारी मंडळी त्यांच्या आदेशाचा असा चुकीचा अर्थ लावतील आणि स्वत:ला अशा तऱ्हेने संकटात टाकतील अशी त्यांनी कल्पना देखील केली नव्हती.

"तुरुंगात गांधीजींना मिनिटांमिनिटांनी बातम्या मिळत असत. ते तुरुंगात होते तरीही त्यांचे मन आपल्या बरोबरच होते. आणि का असणार नाही? शेवटी ते आपले सर्वांचे वडीलच होते ना

! आपली मुले योग्य मार्ग विसरून चुकीच्या रस्त्याला लागली आहेत हे पाहून त्याचे हृदय खूपच दु:खी होत होते.

"देशात जे हिंसक दंगे झाले त्याच्या दोषाचे खापर सरकारने गांधीजींच्या माथी फोडले. देशातील लोकांना अहिंसेचे माहात्म्य समजावून दंगे थांबविण्यासाठी आपल्या काही नेत्यांना सरकार सोडते तर बरे अशी इच्छा गांधीजींनी व्यक्त केली, पण सरकारने त्यांची ही गोष्ट मंजूर करण्यास साफ नकार दिला. गांधीजींनी पाहिले की सरकार कोणत्याही प्रकारे त्यांचे म्हणणे स्वीकारण्यास तयार नाही. तेव्हा त्यांनी आगतिक होऊन उपास करण्याचे ठरविले. १० फेब्रुवारी १९४३ रोजी त्यांनी २१ दिवसांचा उपास सुरू केला. त्या उपासाच्या द्वारे आपण निर्दोष आहोत त्याची जगाला खात्री करून देण्याची त्यांची इच्छा होती.

"ह्या २१ दिवसापुरते गांधीजींना सोडून द्यावे अशी सरकारची इच्छा होती पण गांधीजींनी ती कबूल केली नाही. उपास चालू असताना कस्तुरबा नेहमी त्यांच्या सेवेत गुंतलेल्या असायच्या. दिवसे दिवस गांधीजी अशक्त होत चालले होते सर्व देशातील लोक आगाखान महालाकडे नजर लावून बसले होते. सगळ्यांना एकएक दिवस एका युगासारखा वाटे. लोक आपापली कामे सोडून देवाची प्रार्थना करीत असत. दिल्लीत तीन भारतीय मंत्र्यांनी राजीनामे दिले आणि ते मंत्रीमंडळातून बाहेर पडले. परंतु सरकारने थोडे पण नमते घेतले नाही. प्रार्थना करीत करीत २१ दिवस पूर्ण झाले. ३ मार्चला गांधीजींनी कस्तुरबांच्या हातुन संत्र्याचा रस घेऊन उपास सोडला. मीराबेन ह्यांनी ख्रिस्ती धर्मातील भजने म्हटली. मुसलमानांनी कुराण वाचले. त्याच प्रमाणे पारशी, हिंदू व बौद्ध धर्माच्या लोकांनी देखील गांधीजींना आपापल्या धर्मग्रंथातले उतारे वाचून दाखविले.

"गांधीजींनी उपास सोडला व हिंदुस्थानच्या लोकांच्या जीवात जीव आला. हा उपासाचा परिणाम असा झाला की सबंध देश एका आवाजात 'महात्मा गांधीकी जय' आणि 'इन्किलाब झिंदाबाद' ह्या गर्जनांनी दुमदुमून गेला.

“गांधीजींच्या नशिबी अजून देखील काही दु:खे लिहिली होती. त्यांचे प्रिय साथीदार महादेवभाई मरण पावले ह्या गोष्टीचे दु:ख अजून ताजेच होते. एवढ्यात कस्तुरबा आजारी पडल्या. आजारपणात त्यांनी कैदेत न राहता घरी जाऊन रहावे ह्यासाठी सगळ्यांनी त्यांना खूप समजावले. पण धन्य त्यांचे धैर्य. आजारात देखील गांधीजींना सोडून गेल्या नाहीत. बहुतेक त्यांना कळून चुकले की आपला अंत जवळ येत चालला आहे, म्हणूनच त्या आपल्या पतीला सोडून दुसरीकडे कुठेही जायला तयार झाल्या नाहीत. कस्तुरबांची तब्येत बिघडत गेली. शेवटी ती ठरलेली घटना येवून ठेपली. गांधीजींच्या बरोबरचे साठ वर्षांचे नाते सोडून त्या देवाघरी निघून गेल्या."

हरी—“आई कस्तुरबा सगळ्यांना सोडून गेल्या, तेव्हा गांधीजी खूप रडले असतील नाही?"

आई—“अशा कठीण प्रसंगी दुसऱ्या कुणावरही असे संकट आले असते तर त्याचे काय झाले असते ते सांगणे कठीण आहे. पण गांधीजी तर अशा वेळी देखील देवावर श्रद्धा ठेवून आपल्या देशवासीयांसाठी प्रार्थना करीत होते.



कस्तुरबा आणि महादेवभाई यांची समाधी

“महादेवभाईंच्या समाधी जवळच गांधीजींनी कस्तुरबांची समाधी बांधली. आगाखान महालात नजरकैद राहिले तोपर्यंत गांधीजी नियमितपणे ह्या दोन्ही समाधीवर फुले वाहण्यास व

प्रार्थना करण्यास जात असत. आज देखील दर रविवारी पुण्यातील आणि पुण्याबाहेरील किती तरी लोक ह्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी जात असतात.

"चारी बाजूंनी येऊन पडणारी दुःखे एकटे गांधीजी तरी कोठपर्यंत सहन करू शकणार? त्यांची तब्येत खालावत चालली आणि शेवटी ते खूपच आजारी पडले. गांधीजी खूप आजारी पडलेले पाहून त्यांना सोडून देण्यातच आपले भले आहे हे सरकारला कळून चुकले. ६ मेला कोणत्याही प्रकारची अट न घालता सरकारने त्यांना आणि त्यांच्या साथीदारांना सोडून दिले. आगाखान महालातून निघण्यासाठी गांधीजी दोन्ही समाधींचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी गेले. ह्या प्रसंगी जे हजर होते त्यांच्यात एकही असा नसेल की ज्याचे डोळे पाणवले नसतील."

हरी—"आई ! गांधीजींना तुरुंगातून सोडले आहे ही बातमी मिळताच आपणा सर्वांना खूपच आनंद झाला होता ते तर मला आठवते."

आई—"बाळ ! आपल्या घरातच नव्हे, तर सर्व देशात त्या दिवशी आनंद झाला होता."

# १६

“**गांधीजी** तुरुंगातून बाहेर येताच भारतवासीयांच्या अंधारलेल्या आणि उदास मनात नव्या आशेचा प्रकाश प्रसरला. त्यांना वाटले की आमचा तारणहार आला. आपल्या अशक्त शरीरात पुन्हा ताकद यावी म्हणून गांधीजी थोडे दिवस पुण्याला व जुहूला राहिले. थोडे बरे वाटताच स्वातंत्र्य युद्धाचा हा सेनापती कंबर कसून तयार झाला. त्यांनी लोकांना त्यांची प्रत्येक चूक समजावून सांगितली आणि सरकारच्या चुकांकडे सरकारचे पण लक्ष वेधले. इंग्रजांनी भारतवासीयांना स्वराज्य द्यावे ह्यासाठी त्यांनी पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहिला. पण त्यांना यश मिळाले नाही. इंग्रज हिंदुस्थानचे राज्य सोडायला तयार नव्हते. ते प्रत्येक वेळी एकच गोष्ट पुढे करीत व म्हणत की हिंदू आणि मुसलमान एक होऊन हिंदुस्थानचे राज्य चालवायला तयार असतील तर आम्ही त्यांना स्वातंत्र्य देऊ. गांधीजी म्हणत की हिंदू आणि मुसलमान दोघेही एकाच देशाचे निवासी आहेत. तेव्हा आमच्या मधले मतभेद हा आमचा घरगुती प्रश्न आहे. इंग्रज सरकारने ह्या प्रश्नात लुडबुड करू नये. स्वातंत्र्य मिळाल्यावर ह्या देशात कुणी कसे रहावे ते आमचे आम्ही पाहून घेऊ. परंतु त्यावेळी आपल्या देशात ‘वानर आणि दोन मांजरे' ह्या नाटकाचा प्रयोग चालला होता. एकदा दोन मांजरांमधे भाकरीची वाटणी करताना भांडण झाले. त्यांनी न्याय देण्यासाठी एक वानराला बोलावले आणि त्याला भाकरीची सारखी वाटणी करण्यास सांगितले. वानर खूप लबाड होते. त्याने भाकरीचे दोन तुकडे केले. आणि ते तराजू घेऊन वजन करायला बसले. जे पारडे खाली आले त्यातील एक मोठा तुकडा त्याने खाऊन टाकला. असे केल्याने ते पारडे हलके झाले. पण दुसरे पारडे खाली गेले. दोन्ही पारडी सारखी करण्यासाठी त्याने पुन्हा त्या खाली गेलेल्या पारड्यातून एक तुकडा खाऊन टाकला. आता पहिले पारडे पुन्हा खाली गेले. तेव्हा त्याने पुन्हा त्यातील एक तुकडा खाल्ला. अशा रीतीने दोन्ही पारडी सारखी करता करता त्या पठ्ठ्याने सगळ्या भाकरीचा चट्टामट्टा केला आणि दोन्ही मांजरे एकमेकांचे तोंड पाहात राहिली.

“अशा तऱ्हेने हिंदू आणि मुसलमान दोघेही आपापसात भांडून एकमेकांचा विनाश करीत होते. तेव्हा इंग्रज सरकारच्या अधिकाऱ्यांनी म्हटले, “या आम्ही तुमच्या देशाचे हिंदुस्थान आणि पाकिस्तान असे दोन भाग पाडून देतो. 'काही का असेना पण स्वराज्य तर मिळतेय असे मानून आपल्या नेत्यांनी हे विभाजन स्वीकारले. त्यांना कुठे माहीत होते की ह्या विभाजनामुळे वैमनस्य आणि बेकीचे बी पेरले जाईल?"




गांधीजी – नोआखलीमध्ये

“देशाच्या प्रत्येक भागातून काळजात चर्रर होईल अशा बातम्या येऊ लागल्या पंजाबात काहीतरी गडबड सुरू झाली होती. तेवढ्यात कलकत्याहून बातमी आली को तेथे हिंदू आणि मुसलमान ह्यांच्यामधे दंगा सुरू झाला आहे. भाऊ भाऊ एकमेकांचे शत्रू झाले. ही बातमी ऐकून गांधीजी बेचैन झाले आणि कलकत्याला गेले. त्यांनी जे ऐकले ते खरोखरीच सत्य होते. शेकडो वर्षांपासून एका ठिकाणी खेळीमेळीने राहणारे ते हिंदू-मुसलमान आता एकमेकांचे कट्टर वैरी झाले होते. गांधीजींनी तेथे पोहोचताच कलकत्याच्या मैदानात एक जाहीर सभा घेतली. जे हिंदू आणि मुसलमान एक दुसऱ्याचे तोंड बघायला तयार नव्हते ते सर्व गांधीजींचे म्हणणे ऐकण्यासाठी लाखोंच्या संख्येने एकत्र झाले. गांधीजींनी त्या सगळ्यांना प्रेमाचा संदेश दिला. थोडयाच वेळात त्यांच्या मनातील वैर नाहिसे झाले आणि त्यांची मने निर्मळ झाली. गांधीजींची अशी इच्छा होती

की हिंदूंनी आणि मुसलमानांनी जी हत्यारे गोळा केली आहेत ती त्यांनी त्यांना सोपवून द्यावीत पण लोकांनी तसे केले नाही. तेव्हा गांधीजी समजून चुकले की अजून कसर बाकी आहे. लोकांची मने अजून स्वच्छ झाली नाहीत. त्यामुळे त्यांनी उपास सुरू केला. बंगालच्या लोकांना उपासाची बातमी कळताच शेकडो तरुणांनी हजारोच्या संख्येने हत्यारे आणून गांधीजींना सोपविली आणि ह्यापुढे कधीही आपापसात न लढण्याची प्रतिज्ञा घेतली व ती पाळून दाखविली.

“वैराच्या झळा अजून पूर्ण शमल्या नव्हत्या. गांधीजी देशाच्या एका भागात शांती स्थापीत होते, तेवढ्यात दुसऱ्या भागात ज्वाळा भडकत होत्या. त्याच सुमारास पूर्वबंगालमधे असलेल्या नोआखलीहून अशी बातमी आली की तेथे मुसलमान हिंदूंची घरे लुटत आहेत व हिंदूंची कत्तल करीत आहेत. हे ऐकताच तो हडकुळा म्हातारा प्राण संकटात घालून नोआखली येथील एका गावात प्रेमाचा संदेश घेऊन गेला. गांधीजी बहुतांशी पायीच प्रवास करत. कित्येक ठिकाणी तर ते अनवाणी जात. नोआखलीत ते गावकऱ्यांबेराबरच राहात जेवत आणि झोपत देखील. ते लोकांना बोलावून त्यांना समजावीत आणि लुटलेल्या वस्तू मूळ मालकाला परत करायला लावीत. लोकांना, पुन्हा एकदा स्वत:च्या घरात ते राहू शकतील अशी व्यवस्था ते करून देत व जे एक दुसऱ्यापासून दूर पडले होते अशांना एकत्र करून देत.



आपला राष्ट्रध्वज

“नोआखलीनंतर बिहारची पाळी आली. तेथून बातमी आली की हिंदुनी मुसलमानाची गावेच्या गावे उद्ध्वस्त केली आहेत. बिहारचे संकट ऐकून गांधीजींचे मन कळवळले, आणि ते बिहारला गेले. त्यांनी तेथेपण प्रेमाचा संदेश लोकांना दिला आणि सांगितले की कोणाचाही जीव

घेणे हे एक मोठे पाप आहे. हिंदू आणि मुसलमान सर्व भावंडे आहेत, एकाच देशाचे निवासी आहेत. त्यांनी उगाच भांडणे करून पापाच्या खड्ड्यात कशासाठी उतरावे?"

“सुरुवाती सुरुवातीला तर लोकांनी गांधीजींच्या म्हणण्याकडे लक्ष दिले नाही. पण हळूहळू सत्याच्या आवाजाचा त्यांच्यावर परिणाम झाला. जनावरांसारख्या आपल्या भयंकर वागणुकीने ते चमकून उठले आणि त्यांना मानवतेची खरी जाणीव झाली. लोकांना आपल्या करणीचा पश्चात्ताप झाला आणि त्यांनी शांततेने एकमेकांच्या बरोबर राहण्याची शपथ घेतली.

“ह्या धामधुमीच्या काळात गांधीजींना विश्रांती घेण्याचा विचारदेखील येत नव्हता. त्यांना खाण्यापिण्याचासुद्धा विसर पडला होता. कडकडणाऱ्या थंडीची अथवा गरम वाऱ्याच्या झळांची त्यांना फिकीर नव्हती. कधी कधी ते नोआखलीच्या गावातून अनवाणी फिरताना दृष्टीस पडत, तर कधी कधी बिहारमधल्या लोकांच्या जखमी हृदयावर मलमपट्टी करताना दिसत. त्यांचे धैर्य असे अथांग होते को ते कधी हार कबूल करायला तयारच नसत. त्यांची श्रद्धा अटळ होती आणि अनेक कसोट्यांतून व संकटांतून पार पडल्यामुळे ती अधिकच उज्ज्वल झाली होती. शेवटी भारताचा स्वातंत्र्यदिन येऊन ठेपला आणि चारी दिशांना आनंदी आनंद झाला. पण स्वतंत्रतेच्या प्रकाशाबरोबरच वैर आणि फुटीर वृत्तीचे काळे ढग देखील चारी दिशांना पसरले. दिल्लीत लोक आनंदाने 'माउंट बॅटन को जय' असा जयघोष करीत होते. तर त्याचवेळी बंगालमध्ये काही लोक गांधीजींवर दगडफेक करीत होते. मूर्खपणाच्या आणि गटबाजीच्या भयाण अंधारात आपण रस्ता चुकलो होतो. सगळी प्रेमबंधने तुटून गेली आणि भाऊच भावाचे वैरी झाले. माणसाने लांडग्याचे रूप घेतले असावे असे वाटू लागले. हिंदूंना मुसलमानांच्या रक्ताची चटक लागली होती आणि मुसलमानांना हिंदूंचे प्राण हवे होते. अशा भयानक काळात फक्त दोनचार किरण असे होते जे आपल्या संपूर्ण शक्तीने पापाच्या ह्या अंधकारात प्रकाश पसरविण्याचा प्रयत्न करीत होते.”

हरी—“आई हे किरण कोठले?”

आई—“हे किरण म्हणजे आपले गांधीजी ब त्यांचे साथीदार, पण आपण सगळ्यांनी त्यांच्याकडे पाठ फिरवली होती आणि चारी बाजूंनी फक्त 'मारा, कापा' असेच आवाज येत होते.”

हरी—"आई ! हे आवाज कोणाचे होते?"

आई—"बाळ ! हे आवाज दंगेखोर हिंदू, मुसलमान आणि शीखांचे होते. ते एक दुसऱ्याला खायला धावत. अशा संधीची वाटच पाहात असणाऱ्या गुंडांनी इतके दंगे केले, एवढी कापाकापी केली आणि निर्दोष माणसांच्यावर इतके अत्याचार केले की आपला हा मूर्खपणा पाहून सारे जग चकित झाले." हे ऐकून हरीला खूप दु:ख झाले. तो विचारात पडला आणि म्हणाला, "आई ! हिंदू, मुसलमान आणि शिखांना असे वर्तन करताना पाहून गांधीजींना खूप दु:ख झाले असेल नाही?"

आई—"होय बाळ ! हे सर्व पाहून ते खूपच बेचैन झाले. ते दु:खी होऊन खूप वेळा कळवळून उठत आणि म्हणत की 'हे परमेश्वरा, आता तू मला ह्या जगातून मुक्त कर.

"नोआखली आणि बिहार येथील भांडणे मिटवून ते पंजाबला जात होते तेवढ्यात दिल्लीत दंगे सुरू झाले. सगळे तर तू पाहिले आहेसच. किती भयंकर होते ते दिवस ! गांधीजी दिल्लीला गेले. तेथील दंगे पाहून तेथे शांती स्थापल्याशिवाय पुढे जायला त्यांचे मन तयार झाले नाही आणि ते तेथेच थांबले. दिल्लीत त्यांनी पाहिले की पंजाबमधे ज्यांनी आपले सर्वस्व गमाविले आहे असे लोक लाखोच्या संख्येने दिल्लीत येऊन थडकत होते. ज्यांची मने दुखावली गेली आहेत अशा ह्या लोकांच्या मुळेच दिल्लीत खून मारामाऱ्या होत आहेत, असे लोकांचे मत होते. त्या दु:खी लोकांबद्दल गांधीजींना खूप सहानुभती होती. परंतु ते समजून होते की जर दिल्लीच्या सरकारने परिस्थितीवर अंकुश ठेवला नाही तर दिल्लीच्या दंग्याचा हा भडका सगळ्या देशाची राख-रांगोळी करील."

हरी—"आई ! मग गांधीजींनी काय केले?"

आई—काय करावे ह्याचा गांधीजींनी खूप शांत चित्ताने विचार केला. त्यांनी दिल्लीच्या मोठ्यातमोठ्या अधिकाऱ्यांना बोलावून समजाविले की त्यांनी हिंदू आणि मुसलमान ह्या दोघांना सारखे मानावे. तसेच काळजीपूर्वक व हुशारीने काम करावे. दुसरीकडे त्यांनी निराश्रितांकडे

जाऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना समजाविले, की दिल्लीच्या मुसलमानांनी तुमचे काहीच नुकसान केले नाही. ज्या मुसलमानांनी तुम्हाला तुमच्या घरातून बाहेर काढले आणि तुम्हाला त्रास दिला त्या मुसलमानांचा ह्या मुसलमानांशी काहीही संबंध नाही. ज्यांनी तुम्हाला मारले त्यांचा बदला त्यांना मारून घेणे हे बरोबर नाही. त्यांनी मुसलमानांना समजावले की त्यांनी निराश्रित झालेल्या पंजाबी आणि सिंधी लोकांना हर प्रकारे मदत करावी. जर एकमेकांचा बदला घेण्याची वृत्ती वाढत गेली तर परिस्थिती हाताबाहेर जाईल, हे गांधीजींना बरोबर समजून चुकले होते. ते लोकांना सांगत की कृपा करून सगळेजण समजूतदारपणाने आणि शांत डोके ठेवून काम करा व तसेच स्वत:वर व एकमेकांवर दया करा.




गांधीजी – प्रार्थनासभेत

"जेव्हा गांधीजींनी पाहिले की खरोखर लोकांची डोकी फिरली आहेत आणि रागाच्या भरात ते काहीही ऐकायला किंवा समजून घ्यायला तयार नाहीत, तेव्हा त्यांनी उपास करायचे ठरवले. ते म्हणाले, 'प्राण गेला तरी हरकत नाही, पण मी हिंदू, मुसलमान आणि शीख त्यांना एकत्र आणल्याशिवाय राहणार नाही.' त्यावेळी दिल्लीत खूप गडबड चालू होती. काय करावे आणि काय करू नये हे कोणालाच सुचत नव्हते. शेवटी सर्व धर्मांचे पुढारी एकत्र झाले आणि गांधीजींच्याकडे गेले. त्यांनी प्रतिज्ञा घेतली की आम्ही आमचे प्राण पणाला लावू पण दिल्लीत

दंगे होऊ देणार नाही. ही मंडळी म्हणत आहेत त्याप्रमाणे करून दाखवतील अशी खात्री होताच बापूंनी उपास सोडला व त्याच दिवसापासून दिल्लीतील परिस्थिती सुधारू लागली. "

हरी—"आई ! गांधीजींनी उपास सोडला त्या दिवशी लोकांना किती आनंद झाला होता नाही. सबंध दिल्लीमधे जणू काही सगळ्यांच्या घरी लग्नच आहे असे वाटत होते."

आई—"होय बाळ ! तुझे म्हणणे खरे आहे. चांगल्या लोकांवर गांधीजींच्या उपासाचा खूपच चांगला प्रभाव पडला होता. त्यांच्या आनंदाला सीमा नव्हती. परंतु हिंदू-मुसलमानांना एक करण्याचा गांधीजींचा विचार ज्यांना अजिबात आवडत नव्हता असेही काही लोक होते. त्यांना वाटत होते की गांधीजींच्या अशा प्रकारच्या नीतीने आपण दुबळे होऊन जाऊ. त्यांना असेही वाटत होते की लाठीचे उत्तर लाठीने आणि गोळीचे उत्तर जो गोळीने देईल तोच खरा शूर. दुष्टपणाला भलेपणाने उत्तर देणे म्हणजे दुबळेपणा आणि मूर्खपणा आहे असे मानणाऱ्याना हे देखील माहीत होते की गांधीजी जोपर्यंत जिवंत आहेत आणि जिवंत राहतील तोपर्यंत ते हिंदू-मुसलमान आणि शीखांच्या एकतेसाठी जिवाचे रान करतील. गांधीजी जिवंत असेपर्यंत अशा लोकांचे म्हणणे कोणी ऐकतील अशीही शक्यता नव्हती त्यामुळे अशा लोकांच्यापुढे गांधीजींना मारून टाकणे आणि आपल्या रस्त्यातील काटा दूर करणे हा एकच मार्ग मोकळा होता.

"गांधीजी संध्याकाळचे जेवण लवकर करीत आणि बरोबर पांच वाजता प्रार्थनेच्या सभेत जात. लोक आधीपासूनच प्रार्थनेसाठी जमत आणि त्यांच्या येण्याची वाट पाहात. गांधीजी त्यांच्यामधून जात तेव्हा कोणी त्यांना वाकून प्रणाम करत, कोणी नमस्कार करत, तर कोणी त्यांच्या पाया पडत. गांधीजी प्रार्थनेच्या ठिकाणी एका लहान लाकडी बैठकीवर बसत. कुराण आणि गीता वाचणारे त्यांच्या जवळच बसत. भजन गाणारे देखील तेथेच बसत. प्रार्थनेच्या सुरुवातीला कुराणातील काही ओळी वाचत. नंतर गीतेचे वाचन होई आणि त्यानंतर भजने गात. प्रार्थनेनंतर गांधीजी लोकांना थोडासा उपदेश देत. त्या उपदेशात ते त्या दिवसातील परिस्थितीची कल्पना देत. तसेच उच्च-नीचपणाचा भेदभाव दूर करण्यास सांगत. प्रार्थनेच्या सभेत गांधीजींच्या

आवडत्या ओळी—'ईश्वर अल्ला तेरे नाम, सबको सन्मति दे भगवान' रोज गात असत. अशा प्रकारची किती तरी भजने व प्रार्थना सभेत वारंवार गाईली जात.

"लांबलांबून लोक गांधीजींच्या प्रार्थनासभेत येत असता. हिंदू आणि मुसलमान तसेच हरिजन आणि ब्राह्मण सगळे बरोबर बसून देवाची प्रार्थना करीत."

हरी—"आई ! प्रार्थनासभेत तर मी पण गेलो आहे. तेव्हा तेथे काय होत असे ते मला माहीत आहे, पण गांधीजी गीतेच्या बरोबर कुराण आणि बायबल का वाचीत होते, ते मला कळत नाही."

आई—"बाळ ! गांधीजी असे म्हणत की सगळेच धर्म खरे आहेत. तसेच सर्व धर्मांचे धर्मग्रंथ ईश्वरदत्त आहेत. हे ग्रंथ सत्याचा मार्ग दाखवितात. ते असेही म्हणत की मी हिंदू ही आहे, मुसलमानही आहे, शीखही आहे आणि ख्रिस्तीपण आहे. हे सगळे धर्म माझे आहेत. कारण धर्माचे मूळ आहे सत्य आणि प्रामाणिकपणा.



प्रार्थनासभेत जाणारे गांधीजी

"ठीक, मी तुला आजची गोष्ट सांगत होते. आज त्यांना थोडासा उशीर झाला होता. म्हणनू ते घाई घाईने प्रार्थना सभेत गेले. ते लोकांच्या मधून जात होते तेवढ्यात एक निर्दय माणूस

नमस्कार करण्याच्या निमित्ताने त्यांच्या जवळ आला व त्याने गांधीजींच्यावर गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. गांधीजींच्यावर गोळी झाडणाऱ्याचे हृदय किती बरे कठोर असेल.

"अरे ! हरी ! तू रडत आहेस. रडू नकोस. धीर धर. गांधीजींनी सत्यासाठी प्राण गमावले. अशी माणसे मरत नाहीत, अमर होतात. तू पाहशील की शेवटी विजय त्यांचाच होईल. गांधीजींचा विजय हा सत्याचा विजय आहे. आणि सत्याचा विजय हा भारताचा विजय आहे. हा विजय मिळविण्यासाठी बाल-वृद्ध, स्त्री-पुरुष सगळ्यांना खूप परिश्रम करावे लागतील. गांधीजींनी दाखविलेल्या मार्गाने आपल्या एकट्यालाच जायचे नाही पण आपल्या साथीदारांना पण घेऊन जायचे आहे ३० वर्षापासून गांधीजी आपल्याला हा मार्ग दाखवीत आले आहेत. हा खरा मार्ग विसरून जाऊन जे लोक असत्य, वैरभाव आणि हिंसा ह्या चुकीच्या मार्गाला लागले आहेत त्यांना आपल्याला सत्याच्या मार्गावर आणायचे आहे.

"आपण केवळ हिंदू, मुसलमान, शीख अथवा ख्रिस्ती आहोत असा विचार कधीही करता कामा नये. तर आपण सगळे भारतीय आहोत ही गोष्ट आपण नेहमी लक्षात ठेवली पाहिजे. आणि सच्चे भारतीय ह्या नात्याने आपण सर्वांनी हिंदू-मुस्लिम एकतेसाठी काम केले पाहिजे. हिंदुस्थान आणि पाकिस्तान ह्या दोघांनाही सर्व जाती एक आहेत असे शिकविले पाहिजे. हिंदू, मुसलमान, शीख सगळी ईश्वराची मुले आहेत. सगळ्यांनी मिळून, मिसळून प्रेमाने रहिले पाहिजे."

हरी—"आई ! खरा भारतीय होण्यासाठी मी काय केले पाहिजे?"

आई—"बाळ ! त्यासाठी आपण गांधीजींनी दाखविलेल्या मार्गाने गेले पाहिजे. ज्यात गरीबी आणि दु:ख असणार नाही, दुबळ्यांवर बलवान अत्याचार करणार नाहीत, श्रीमंत आणि गरीब, हिंदू आणि मुसलमान असा भेदभाव असणार नाही, सगळे समान असतील, कोणी कोणावर जुलूम करणार नाही आणि ज्यामधे सर्वजण शिकून सवरून आनंदाने राहतील असा भारत आपण घडवूया. ह्यासाठी सत्य, बलिदान, त्याग व पुरुषार्थ हे आपणामधे बिंबविले पाहिजेत. आपण सगळे जर हे काम मनावर घेऊ तर गांधीजींच्या आत्म्याला खूप शांती मिलेल.

अर्थात प्रत्येक वेळी आपल्याला आपल्या कामाचे फळ मिळेल असे नाही. परंतु त्यामुळे निराश न होता आपण प्रयत्न चालू ठेवला पाहिजे हेच गांधीजींच्या अनुयायांचे कर्तव्य आहे. गांधीजींचे खरे अनुयायी तर फळाची आशा न ठेवता रात्रदिवस कामच करीत असतात आणि हीच खरी सेवा आहे."

हरीची आई हरीला गांधीजींची गोष्ट सांगत होती तेवढ्यात आजोबा रेडिओवर झालेली पंडित जवाहरलाल आणि सरदार पटेल ह्यांची भाषणे ऐकून आले व म्हणू लागले—

"बिचाऱ्या पंडितजींच्यावर तर जणू काही दुःखाचा डोंगर कोसळला. रेडिओवर खूप गहिवरलेल्या आवाजात त्यांनी म्हटले, 'मित्रांनो दिवा विझला आहे आणि आपल्या जीवनावर अंधार पसरला आहे. मी तुम्हाला काय सांगू को आपले नेते, आपले वडील मरण पावले आहेत. देशात वैरभाव पसरला आहे. ह्या वैराने लोकांची मने पण कलुषित झाली आहेत. आपण शांतीपूर्वक व धैर्याने ह्या विष वृक्षाला उपटून काढले पाहिजे. आपल्याला मोठमोठ्या आपत्तींना तोंड द्यावे लागेल आणि ते देखील गांधीजींनी शिकविले आहे, त्याच रीतीने उद्या सर्वांनी उपास करावा आणि प्रार्थना करावी. उद्या चार वाजता गांधीजींना अग्नि देण्यात येईल. आपण सगळे गांधीजींच्याप्रमाणे देशासाठी आपले जीवन समर्पित करुया."

"त्यानंतर सरदार पटेल बोलले. गांधीजींच्या मृत्यूचा त्यांच्यावर पण खूप परिणाम झाला होता. त्यांनी म्हटले, 'तुम्हाला काय सांगू की काय झाले आहे? पण जे झाले काहे ते फारच दुःखदायक आणि लज्जास्पद आहे. अलीकडे कित्येक दिवसांपासून गांधीजींना देशातील परिस्थितीमुळे वाईट वाटत असे. त्यामुळे त्यांनी उपास केला होता. जे काही घडले आहे त्याचे दु:ख झाल्याशिवाय राहणार नाही. पण त्यामुळे राग येता कामा नये. राग आल्यास आपण त्यांचा उपदेश विसरून जाऊ अशी भीती वाटते. गांधीजी जीवंत असताना जे आपण करू शकलो नाही ते आता आपल्याला करून दाखवायचे आहे. नाहीतर गांधीजींच्या शिकवणुकीप्रमाणे आपण वागू शकलो नाही असा कलंक आपल्याला लागेल. आज घडलेली दु:खद घटना आपल्या तरुणांना

जाग्रत करील आणि त्यांना योग्य मार्ग दाखवील अशी मी प्रार्थना करतो. निराश होण्याची जरुर नाही. आपण सगळ्यांनी एक होऊन गांधीजींनी सुरू केलेले काम पूर्ण करायचे आहे."

आजोबांची गोष्ट ऐकून हरीच्या आईच्या डोळ्यांत अश्रू आले. ते पाहून आजोबा म्हणाले, "अरे तू रडत आहेस, रडण्याने काय होणार? कपाळाला हात लावून बसून राहण्याची ही वेळ नाही. ह्याच क्षणी गांधीजींच्या शत्रूंच्या विरुद्ध आपण कंबर कसली पाहिजे आणि सांगितले पाहिजे की, आम्ही गांधीजीचे वारस आहोत, त्यांचे सैनिक आहोत आणि त्यांच्या शत्रूंच्या विरुद्ध लढायला उभे राहिले आहोत. सत्याचा झेंडा, अहिंसेची ढाल आणि आत्मविश्वासाची तलवार घेऊन रक्ताचा एक थेंबही सांडल्याशिवाय आम्ही लढू आणि जिंकू आम्हाला कोणीही रोखू शकणार नाही.

"चला सगळे भारतीय एक होऊन जागृत होऊया. आपले अश्रू पुसून टाकून नवीन आशा उराशी बाळगून आगेकूच करूया. गांधीजींच्या तेजाने आणि शक्तीने आपण जगाला सिद्ध करून दाखवूया की सत्याचाच विजय होत असतो. गांधीजी कोण होते आणि त्यांची काय इच्छा होती ते जगाला दाखवून देऊया."

* * * * *